मोदी सरकार पुन्हा एकदा सज्ज!

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १६ ◆ अंक २२६
www.ramprahar.com

रविवार, ३ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

नरवीर तानाजी मालुसरेंच्या स्मारकाचे होणार उद्घाटन/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
निखिल इलेव्हन संघ भाजप चषकाचा मानकरी/८

# लोकसभा निवडणुकीसाठी भाजपची पहिली यादी जाहीर

## १६ राज्यांतील १९५ उमेदवार घोषित; पंतप्रधान मोदी वाराणसीतून लढणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी शनिवारी (दि.२) पत्रकार परिषद घेऊन १६ राज्यांमधील १९५ उमेदवारांची नावे घोषित केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपचे पहिले उमेदवार असून ते त्यांच्या वाराणसी मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. भाजपने पहिल्या यादीत २८ महिलांना उमेदवारी दिली आहे.




भाजपकडून उत्तर प्रदेशमधील ५१, मध्य प्रदेशमधील २४, पश्चिम बंगालमधील २०, गुजरात व राजस्थानातील प्रत्येकी १५, केरळमधील १२, आसाम, झारखंड व छत्तीसगडमधील प्रत्येकी ११, तेलंगणातील नऊ, दिल्लीतील पाच, उत्तराखंडमधील तीन, जम्मू काश्मीर व अरुणाचल प्रदेशमधील प्रत्येकी दोन, तर गोवा, त्रिपुरा, अंदमान निकोबार व दीव–दमणमधील प्रत्येकी एका उमेदवाराच्या नावाची घोषणा केली गेली आहे. पहिल्या यादीत ३४ विद्यमान मंत्र्यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दुसऱ्यांदा गांधीनगर लोकसभेची जागा लढवणार आहेत.

भाजपच्या या यादीत ५०पेक्षा कमी वय असलेले ४७ उमेदवार आहेत तसेच ओबीसी ५७, अनुसूचित जाती २७ व अनुसूचित जमातीचे १८ उमेदवार आहेत. अशा प्रकारे समाजातील सर्व वर्गांना उमेदवारी देताना पहिल्या यादीत प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखालील पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक २९ फेब्रुवारी रोजी झाली. या बैठकीत पहिल्या १९५ उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार देशातील १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील उमेदवारांची यादी जाहीर करीत आहोत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली गेल्या १० वर्षांत विविध जनहिताचे निर्णय घेण्यात आले आहेत. म्हणूनच या वेळचा संकल्प भाजप ३७० आणि एनडीए ४०० पार असा आहे.**

**–विनोद तावडे, भाजप सरचिटणीस**




**पनवेल** : लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात नमो चषक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने पनवेल विधानसभा क्षेत्रात कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव उत्साहात झाला. या महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी क्रिकेटपटू तथा प्रशिक्षक दिलीप वेंगसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत व सन्मान केला. सोबत भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी. (वृत्त उद्याच्या अंकात).




**ठाणे** : लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांचा वाढदिवस शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त खारीगाव येथे ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि जय भारत स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने दशरथदादा पाटील चषक २०२४ कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत दशरथदादांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी मंत्री जगन्नाथ पाटील, भाजप ओबीसी सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, विनोद म्हात्रे आदी उपस्थित होते.

## ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांना पोलिसांचे समन्स

**मुंबई : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांना मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने समन्स बजावले आहे. निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटालाच खरी शिवसेना घोषित केल्यानंतरही उद्धव गटाकडून ५० कोटी पक्षनिधी काढल्याचा आरोप आहे.

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात आता कारवाईला वेग आला आहे. अनिल देसाई यांना ५ मार्च रोजी यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे.

# स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळ विकासकामाचे भूमिपूजन

### मान्यवरांची उपस्थिती

**पुणे : प्रतिनिधी**

स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील वढू येथील समाधीस्थळाच्या विकासकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.२) झाले.

या वेळी मान्यवरांनी सर्वप्रथम छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन केले. या समाधीस्थळी ११० कोटी ७६ लाख रुपये खर्चून संग्रहालय, प्रशासकीय कार्यालय, वैद्यकीय कक्ष, सभागृह, स्मरणिका दुकाने, छत्रपती संभाजी महाराज यांचे ६० ते ६५ फूट उंच धातूचे प्रतिकात्मक शिल्प, भित्तीचित्रे आदी कामे करण्यात येणार आहेत.








# विविध विकासकामांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## बारामतीमध्ये कार्यक्रम; मान्यवरांची लाभली उपस्थिती

**पुणे : प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील बऱ्हाणपूर येथे नव्याने निर्मित पोलीस उपमुख्यालयाचे तसेच अन्य विविध विकासकामांचे उद्घाटन आणि लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.



विद्या प्रतिष्ठान येथील मैदानावर आयोजित या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, ज्येष्ठ नेते तथा खासदार शरद पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार सुप्रिया सुळे, आमदार दत्तात्रय भरणे आदी उपस्थित होते.

बारामतीचा विकासाचा पॅटर्न केवळ राज्यातच नव्हे; तर देशभरात पोहचविण्यासारखे असे भव्य पोलीस उपमुख्यालय उभारण्यात आले आहे. बऱ्हाणपूर या गावाच्या हद्दीत ६५ एकराच्या प्रशस्त परिसरात हे उपमुख्यालय बांधण्यात आले आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात १५ हजार ६५९ चौ. मी.च्या जोत्यावर ३२ हजार ७८५ चौ.मी.मध्ये प्रशासकीय इमारत, पोलीस अधीक्षक निवासस्थान, उपअधीक्षक निवासस्थान, सायबर पोलीस ठाणे, विश्रामगृह, आरपीआय. इमारत, प्रशिक्षण केंद्र, बहुद्देशीय सभागृह, मुलांचे वसतिगृह, मुलींचे वसतिगृह, पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांसाठीची निवासस्थाने, पोलीस मोटार ट्रान्सपोर्ट कार्यशाळा या इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

याशिवायं दुसऱ्या टप्प्यात चार हजार ८०२ चौ. मीटर बांधकाम क्षेत्रावरील कामे प्रगतिपथावर असून यात क्लब हाऊस, जलतरण तलाव, इन डोअर शूटिंग रेंज, उपहारगृह, शॉपिंग सेंटर, खेळाच्या मैदानात बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेनिस लॉन, फुटबॉल मैदान, रनिंग ट्रॅक अशा सर्व मूलभूत आणि आधुनिक गरजेच्या सोई-सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. या एकूण प्रकल्पाचा खर्च १४२ कोटी ६२ लाख रुपये आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते बारामती येथील बसस्थानकाचेही उद्घाटन करण्यात आले. बसस्थानक, आगार व निवासस्थानाची पुनर्बांधणी करण्यात आली असून बसस्थानकाचा संपूर्ण परिसर सुंदर आणि कल्पकतेने उभारला आहे. जागेचे एकूण क्षेत्रफळ २४ हजार ७४८ चौ.मी. आहे. यामध्ये तळमजला व पहिल्या मजल्यावर बस स्थानक कार्यालय, तळमजल्यावर आगार आणि पार्सल कक्ष असे बांधकाम करण्यात आलेले आहे. बसेस उभे राहण्यासाठी २२ फलाट उभारण्यात आले असून तळमजल्यावर २२ दुकाने आणि पहिल्या मजल्यावर २१ कार्यालये, १२३ आसनी परिसंवाद कक्ष, ३६ आसनी बैठक व्यवस्था आणि ३२ आसनी शयनकक्ष आहेत.

बारामती येथे अपर अधीक्षक कार्यालयाचे उद्घाटनदेखील या वेळी करण्यात आले. वाहतूक शाखा आणि शहर पोलीस ठाणे यांच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे एकूण १४ हजार ६२ चौ.मी. क्षेत्रफळात बांधकाम करण्यात आले आले. या कामाकरिता आतापर्यंत २७ कोटी ७७ लाख रुपये खर्च आला आहे.

बारामतीच्या सौंदर्यात भर घालणारी पोलीस वसाहत बारामती येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी १०० वर्षापूर्वीच्या जुन्या बैठ्या दगडी ७५ निवासी खोल्या होत्या. त्या मोडखळीस आल्यामुळे तेथे सात मजली सात इमारती मूलभुत सोयीसुविधांसह बांधण्यात आल्या आहेत. त्याचा फायदा १९६ पोलीस कुटुंबियांना होणार आहे. ही निवासस्थाने बैठकीची खोली, स्वयंपाकघर, दोन शयनगृहे आदी सुविधांसह आहेत.

याशिवाय इंदापूर तालुक्यात वालचंदनगर येथे श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गात पोलीस ठाण्याची इमारत गेल्यामुळे तेथे नव्याने पोलीस ठाण्याची सुसज्ज इमारत आणि पोलीस अधिकाऱ्यांसाठी चार अधिकारी निवासस्थाने बांधण्यात आली आहेत. या सर्व कामावर ७५ कोटी ४४ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. या वसाहतीचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक मनोज कुसेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण आदी उपस्थित होते.

## हौसिंगच्या प्रश्नासंदर्भात लवकरच बैठक घेणार

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन

**मुंबई :** गृहनिर्माण सोसायट्याबाबत उर्वरित निर्णयांची अंमलबजावणी करण्याकरिता आचारसंहिता लागण्यापूर्वी बैठक लावावी अशी विनंती भाजप विधानपरिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी असभागृहात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनीही दरेकर यांच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद दिला.

सभागृहात बोलताना दरेकर म्हणाले की, अभ्यूदय नगरच्या मैदानावर २५ हजार लोकांनी नोंदणी केली होती. त्या कार्यक्रमात मी मुंबईतल्या हौसिंग सेक्टरच्या समस्या मांडल्या होत्या. अभ्यूदय नगर पुनर्विकासाचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचा भाषणातही उल्लेख केला होता. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यासपीठावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन केला, मंजुरी घेतली आणि १५ दिवसांत हा विषय मंत्रिमंडळ बैठकीत आणतो म्हणून सांगितले. त्यानुसार तो विषय मंत्रिमंडळ बैठकीत आणून अभ्यूदय नगरचा पुनर्विकास मार्गी लावला. एक अभूतपूर्व कामकाजाची पद्धत देवेंद्र फडणवीसांच्या रूपाने महाराष्ट्र अनुभवतोय.

हौसिंग सेक्टरमधील प्रलंबित प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी एक उच्च स्तरीय बैठक आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी लावावी, अशी विनंती दरेकरांनी केली. त्यावर बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हौसिंग सेक्टरमधील जवळपास १६ मुद्यावर निर्णय केले आहेत. अजून छोटे मोठे मिळून ३५ मुद्दे आले आहेत त्याही संदर्भात मी बैठक घेऊन लवकरात लवकर निर्णय घेऊ, असे आश्वस्त केले.

## उमरोली येथील श्री काळभैरव गावदेवी मंदिराचे आज उद्घाटन

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील उमरोली (दिवाळी) येथील श्री काळभैरव गावदेवी मंदिराचा भव्य उद्घाटन सोहळा रविवारी (दि. ३) भाजप नेते संजयआप्पा ढवळे यांच्या हस्ते होणार आहे.

यादिवशी सकाळी ८ वाजता देवता पूजन, होम हवन, कलश पूजन, घंटा पूजन, ध्वज लावणे, दुपारी १२.३० वाजता आभार प्रदर्शन, दुपारी २ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ४ वाजता महिलांसाठी कार्यक्रम, रात्री ८ वाजता स्नेहभोजन, रात्री ९ वाजता भजन, असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत तरी या सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थ मंडळ उमरोली (दिवाळी), मुंबई मंडळ, महिला मंडळ, नवतरुण मित्र मंडळ यांनी केले आहे.

# नागरिकांनी पोलीस व सागरी दलाशी समन्वयाची भूमिका घ्यावी -आ. तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

आपल्या सर्वांचे देशाचे सुजान नागरीक म्हणुन सागरी रक्षक, सागरी रक्षक दल व पोलीस यांच्याशी समन्वयाची भुमिका असणे आवश्यक आहे. अनेक लोक समाजासमोर येत नाहीत, परंतु हेच पोलिसांना समाजातील हालचालीची माहिती देत असतात. त्यामुळे समाजातील घडामोडी पोलिसांना कळत असतात. सागरी दलाकरीता वेगळे प्रशिक्षण मिळावे यासाठी विशेष निधी अर्थसंकल्पात तरतूद उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. रायगड जिल्ह्यात विविध २७०० गुन्हे घडले असून यामध्ये ८७ टक्के गुन्हे उकल करण्यात रायगड जिल्हा पोलीस दल यशस्वी झाला आहे, असे आमदार अनिकेत तटकरे यांनी सांगितले.



रायगड जिल्हा पोलीस दल यांच्या वतीने सागर रक्षक मेळावा रोहा तालुक्यातील किल्ला येथील ओम नमः शिवाय मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आले होते. या वेळी मार्गदर्शन करताना आमदार अनिकेत तटकरे बोलत होते.

या वेळी पोलिस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे, रोहा पोलीस उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, तहसीलदार प्रकाश म्हेत्रे, रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, पाली पोलीस निरीक्षक सरीता चव्हाण, नागोठणे पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर, कोलाड पोलीस निरीक्षक नितीन मोहीते, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलटकर, मयुर दिवेकर, माजी तालुकाप्रमुख विष्णु लोखंडे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी पोलिस दलाच्या वतीने विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या या यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सह्याद्री वन्यजीव रक्षणकर्ता सामाजिक सस्था व पोलिस मित्रांचा सत्कार ही करण्यात आला. या वेळी चित्र फीत दाखविण्यात आली. या कार्यक्रमास पोलीस, सागर रक्षक दल, पोलीस पाटील, सरपंच, नागरिक व महीला उपस्थित होत्या.

# ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर आणि कर्तृत्वावर विश्वास ठेवत नवी मुंबईतील उबाठा गटातील विभाग प्रमुख दर्शन भणगे, उपशहर प्रमुख मेहेर यांनी यांनी आपल्या प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेना पक्षाचे उपनेते विजय नाहटा यांच्या नेतृत्वाखाली नेरूळमधील रामलीला मैदान येथील एका सोहळ्यात शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

या वेळी आयोजित जाहीर पक्ष प्रवेशात उपनेते विजय नाहटा यांनी ठाकरे गटातील कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन मूळ शिवसेनेत मोठ्या संख्येने कार्यकर्ते येत आहेत. शिवसेना पक्षाच्या माध्यमातून सामान्य कार्यकर्त्यांची कामे होत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात नवी मुंबईतील शिवसेना पक्ष संघटना अधिक मजबूत होईल. आमचा शिवसैनिक रात्रंदिवस काम करत आहे. मनामध्ये कोणतीही शंका कुशंका न ठेवता आपण लोकांची सेवा करा त्यासाठी माझे सर्वप्रकारे सहकार्य राहील असे आश्वासन उपनेते विजय नाहटा यांनी यावेळी बोलताना दिले.

या वेळी व्यासपीठावर शिवसेना महिला जिल्हा संघटक सरोज पाटील, उपजिल्हा प्रमुख दिलीप घोडेकर, उपजिल्हा प्रमुख मिलिंद सूर्यराव, नवी मुंबई शहर प्रमुख माजी नगरसेवक विजय माने, माजी नगरसेवक रामाशेठ वाघमारे आदी उपस्थित होते.



## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये शिवजयंती रथयात्रेनिमित्त केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनादेखील प्रोत्साहन मिळाले.

१९ फेब्रुवारी रोजी पनवेल महापालिकेमार्फत घेण्यात रथयात्रा स्पर्धेत येथे लोकनेते लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाचा द्वितीय क्रमांक आला होता, मात्र यासाठी ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली त्यांना रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते या सर्वांना रोख रक्कम देण्यात आली. या वेळी रायगड विभागाचे इन्स्पेक्टर रोहिदास ठाकूर, शाळेच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, पी. आर. ओ, रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठेचे बाळासाहेब कारंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रोत्साहनाने सर्वच कर्मचारी भारावून गेले. त्यांची नावे अनुक्रमे पी. टी. शिक्षक हितेश कडू, कला शिक्षक संगम भोईर, शिक्षिका दिपाली कुलकर्णी तर शिक्षकेत्तर कर्मचारी अजय मुंडकर, रितेश झावरे, परेश म्हात्रे व अमित ढेरे अशी आहेत. नेहमीच विविध कल्पनात्मक उपक्रम राबवणाऱ्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी यातून सर्वांचे अभिनंदन केले व असेच यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या स्मारकाचे मंगळवारी उद्घाटन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरठ येथे नरवीर तानाजी मालुसरे यांच्या शौर्यदिनाचे आयोजन सोमवारी (दि. ४) होणार असून मंगळवारी (दि. ५) सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधी व स्मारकाच्या सुशोभिकरण सोहळ्याचे मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांच्याहस्ते ऑनलाईन उद्घाटन होणार असून या वेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, पर्यटनमंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री उदय सामंत तसेच महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांचीही ऑनलाईन उद्घाटनावेळी उपस्थिती लाभणार आहे.



या वेळी उमरठ येथे रायगड लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे आणि महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरतशेठ गोगावले उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती नरवीर तानाजी मालुसरे उत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट उमरठतर्फे अध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

मंगळवारी होणाऱ्या पुण्यतिथी कार्यक्रमावेळी रायगड जिल्ह्यातील आमदार महेंद्र दळवी, आमदार प्रवीण दरेकर, जिल्हाधिकारी किसन जावळे, राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी भारत बास्टेवाड, माजी राजिप अध्यक्ष आस्वाद पाटील, रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घारगे, सा.बां.विभाग रायगड अधिक्षक अभियंता सुषमा गायकवाड, राजिपचे कार्यकारी अभियंता प्रसन्नजीत राऊत, महाड कार्यकारी अभियंता महेश नामदे, महाड प्रांताधिकारी डॉ.ज्ञानोबा बाणापुरे, पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, पोलादपूर उपविभाग सा.बां. उपअभियंता अमृत पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाबाबत निर्देश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ या अर्थिक वर्षातील प्रकरणे १५ दिवसांच्या आत मंजूर करावीत. तसेच जिल्हयाचे निर्धारीत उदिष्ट पूर्ण करावे असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या, बँक ऑफ इंडिया झोनल ऑफिसर मुकेश कुमार, स्टेट बँक ऑफ इंडिया झोनल ऑफिसर राघेन्द्र कुमार, बँक ऑफ इंडिया अलिबाग जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी, सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया जिल्हा समन्वयक प्रदीप जायभाये, आरडीसी बँकेचे सुभाष म्हात्रे, बँक ऑफ महाराष्ट्रचे मृणाक राणा, संगीता देसाई तसेच इतर बँकाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रायगड जिल्ह्याकरिता शासना कडून ९६५ प्रकल्पाचे उद्दीष्ट प्राप्त झालेले असून या वर्षी एकूण १५०० प्रकरणे बॅकेकडे मंजूरी करीता पाठविण्यात आलेली आहेत.

सुक्ष्म व लघु उद्योजकांची निर्मिती व्हावी व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या यांनी केले आहे.

## उणेगाव येथे महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री काळभैरव मुंबईकर मंडळ सत्वे आळी यांनी उणेगाव येथे महाशिवरात्री उत्सवानिमित्त ८ ,९ व १० मार्च २०२४ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तरी या उत्सव सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

महाशिवरात्री उत्सवानिमित्त शुक्रवारी (दि. ८) शिवअभिषेक, सत्यनारायणाची महापुजा, सांस्कृतिक कार्यक्रम, शनिवारी (दि. ९) जत्रोत्सव छबिना, भव्य जिल्हा स्तरीय खुल्या आकर्षक बक्षिसांचा लहान व मोठा गट नृत्य स्पर्धा, आकर्षक बक्षिसे देऊन विजयी स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

प्रथम येणाऱ्या १५ ग्रुपला स्पर्धेत प्राधान्य देण्यात येणार असून प्रवेश नी: शुल्क आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या ग्रुपनी आपली नाव नोंदणी ५ मार्च २०२४पर्यंत करणे बंधनकारक असून अधिक माहितीसाठी शिक्षक संकर शिंदे (९४२१२५५२४०), विठोबा सत्वे (८३०८५५७७१२) यांच्याकडे संपर्क साधावा. तसेच रविवारी (दि. १०) पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाची जोरदार तयारी श्री काळभैरव मुंबईकर मंडळ सत्वे आळी व उणेगाव ग्रामस्थ यांच्याकडून करण्यात आली आहे.

## निवडक

### आदिवासींसाठी दाखले शिबिर



**पनवेल :** तहसील कार्यालय पनवेल, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, ग्रुप ग्रामपंचायत आपटा, ग्रुप ग्राम पंचायत गुळसुंदे आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था, बांधनवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने कोरलवाडी (आपटा) येथे आदिवासी बांधवांसाठी जातीचे दाखले, रेशन कार्ड व इतर शासकीय प्रमाणपत्र नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, वीणा कोरगावकर, राजू पाटील, मानसी पाटील, गुरुदास वाघे, विठ्ठल पांढरे, कविता बळी, गणेश गायकर, लक्ष्मण पवार, संतोष पवार, प्रकाश म्हात्रे, लक्ष्मण पवार आदी उपस्थित होते.

### चिंध्रण येथे विज्ञान जत्रा

**पनवेल :** चिंध्रण सुधागड एज्युकेशन सोसायटी हायस्कूल येथे अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन व डाऊ केमिकल प्रा. लि.यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य विज्ञान जत्रा भरविण्यात आली होती. भव्य विज्ञान जत्रेमध्ये १४ शाळानी सहभाग घेतला होता. १४ शाळेमधून ७० प्रोजेक्ट आले होते. पाच शाळांनी भव्य विज्ञान जत्रा बघण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांसोबत उपस्थिती लावली होती. डाऊ केमिकल प्रा. लि.यांची टीम, चिंध्रण ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य व अगत्या इंटरनॅशनल फाउंडेशनची टीम आणि सुधागड एज्युकेशन सोसायटी हायस्कूल चिंध्रण यामधील सर्व शिक्षक स्टाफ, विद्यार्थी या सर्वांनी कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी केला.



# पनवेल मनपाची सुट्टीच्या दिवशीही कामे

- नागरिकांना कर भरता येणार
- शनिवार व रविवारीही कार्यालये सुरू राहणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे आर्थिक स्त्रोत मालमत्ता कर वसुली विभाग असून २०२३-२४करिता मालमत्ता कराचे शंभर टक्के वसुलीचे उद्दिष्टे गाठणे जरुरीचे आहे. त्याकरिता मालमत्ता कर वसुली विभाग, पाणी कर संकलन विभाग, लेखा विभाग, नागरी सुविधा केंद्र, प्रभाग समिती अ, उपविभाग नावडे, प्रभाग समिती ब, प्रभाग समिती क, प्रभाग समिती ड ही सर्व कार्यालये १ मार्चपासून प्रत्येक शनिवार व रविवार सुरू राहणार आहेत.

आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार संबंधीत विभाग प्रमुख व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचाऱ्यांनी १ मार्चपासून प्रत्येक शनिवार व रविवार कार्यालयात कामकाजाकरीता हजर राहावे असे पत्र काढले आहे. त्यामुळे नागरिकांनी आपला मालमत्ता कर तसेच पाणी बिल भरण्यास कामकाजाच्या पाच दिवसांबरोबर शनिवार व रविवारी यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.





दरम्यान, पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने थकबाकीदारांना मालमत्ता जप्ती पूर्व नोटीसा देण्याचा धडाका सुरू केला आहे. गेल्या एक दोन दिवसांमध्ये नवीन पनवेल, तळोजा एमआयडीसी, कामोठे, खारघर अशा विविध ठिकाणी महापालिकेच्या जप्ती पथकाने जप्ती नोटिसांचे वाटप केले. परिणामी महापालिकेच्या मालमत्ता करांमध्ये वाढ दिसून येत आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात आत्तापर्यंत २६६ कोटी मालमत्ता कर जमा झाला आहे.

मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून चारही प्रभागांमध्ये केले जात आहे. या आवाहनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. मालमत्ताधारकांना आपले मालमत्ता कराचे बिल हवे असल्यास वेबसाइटवर जाऊन किंवा संबधित प्रभाग कार्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी PMC TAX APP मोबाईल ॲप विकसित केले आहे तसेच www. panvelmc. org या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

#### दैनंदिन अहवाल सादर करण्याच्या पथकास सूचना

*पनवेल महापालिका आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या २ फेब्रुवारी रोजीच्या सूचनेनुसार उपायुक्त गणेश शेटे व सहायक आयुक्त स्वरूप खारगे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यालयात मालमत्ता कर विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपायुक्त गणेश शेटे यांनी थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी मालमत्ता अटकावणी करण्याबाबत वसुली पथकास निर्देश दिले. तसेच सहायक आयुक्त स्वरूप खारगे यांनी वसुलीचा दैनंदिन अहवाल सादर करण्याच्या वसुली पथकास सूचना दिल्या.*



**पनवेल : भारताचे माजी क्रिकेटपटू तथा प्रशिक्षक दिलीप वेंगसरकर हे प्रसिद्ध उद्योजक राजू गुप्ते यांच्या निवासस्थानी आले असता त्यांची माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट घेतली.**

## घरपट्टीच्या पावती दुरूस्त करून सुधारित नोटिसा द्या -ॲड. भुजबळ

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल भागातील घरपट्टीच्या पावती वरील चुकीच्या नोंदी ताबडतोब दुरुस्त करून सुधारित घरपट्टीच्या नोटीस देण्याची मागणी माजी नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ यांनी पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांना पत्र देऊन केली आहे.

आपल्या पत्रात त्यांनी नवीन पनवेल पोदी भागातील घरपट्ट्यांबाबत यापूर्वी चुकीचे क्षेत्र तसेच चुकीचा घर नंबर व प्रॉपर्टी नंबर देऊन घरपट्टी नोटीसा वाटप केल्याने सर्व नागरिकांना त्रास नाहक सहन करावा लागला होता. त्यामुळे त्यांना नाहक दंडाचा आर्थिक भुर्दंड पडलेला होता. याबाबत मी आपणाकडे सर्व्हे करण्यासाठीं अर्ज केला होता. आपल्या कार्यालयाकडून दोन वेळा सर्वे करण्यात आला. पण आता पुन्हा जुन्याच पद्धतीने घरपट्ट्यांचे वाटप झाले आहे. त्यामुळे एकतर आपण नेमलेला कंत्राटदार हा योग्य पद्धतीने काम करीत नाही किंवा आपले पालिकेचे कर्मचारी योग्य रीतीने काम करत नाही असे दिसून येत आहे

सन २०२४-२५ची घरपट्टी भरण्याची रहिवाशांची इच्छा असूनही चुकीचे घर नंबर व वाढीव घरपट्टी आल्यामुळे ते घरपट्टी भरू शकत नाही. त्यामुळे घरपट्टी भरण्यास उशीर झाल्यास त्यावर होणाऱ्या दंडाचे रक्कम त्यांना भरावी लागणार आहे. आपल्या कार्यालयाकडून चुकीचे घर नंबर आल्यामुळे रहिवाशांना हा नाहक भुर्दंड सोसावा लागणार आहे. त्यामुळे आपण आपल्या कार्यालयाला नवीन सर्व्हे प्रमाणे सुधारित घरपट्टीच्या नोटिसा देण्यास सांगावे अन्यथा रहिवाश्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असे ॲड. मनोज भुजबळ यांनी पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## उरण तालुक्यातील शाळांमध्ये दहावीच्या परीक्षेला सुरुवात



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील शाळांमधील परीक्षा केंद्रात दहावी बोर्डाच्या परीक्षेला प्रारंभ झाला असून, मराठी भाषेचा पहिला पेपर सुरळीतपणे झाला.

या वेळी पेपर सुरू होण्याआधी संबंधित बहुतांशी पालकांनीही परीक्षा केंद्रातील शाळांच्या गेटवर हजेरी लावली होती. या वेळी शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. दहावीच्या परीक्षेसाठी चिरनेर केंद्रात शुक्रवारी पहिल्याच दिवशी असलेल्या मराठीच्या पेपरसाठी चिरनेर, आवरे, फुंडे, जासईसह उरण शहरातील शाळांतील दहावीचे विद्यार्थी परीक्षा केंद्रात दाखल झाले होते.

ही दहावी बोर्ड परीक्षा अतिशय शांततेच्या वातावरणात सुरू झाली असून, पुढील पेपरही कोणताही अनुचित प्रकार न घडता सुरळीतपणे पार पडेल, अशी माहिती पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा दहावी परीक्षा केंद्राचे प्रमुख सुरदास राऊत यांनी दिली. या वेळी परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थी वर्गाला पालक आणि शिक्षकवर्ग अनेक सूचना देताना दिसत होते.

## सीकेटी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सीए फर्मला भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी कामोठे येथील प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट किरण भोसले यांच्या कार्यालयास भेट दिली.

या उपक्रमामध्ये सीकेटी वाणिज्य शाखेतील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. किरण भोसले यांनी विद्यार्थ्यांना सीए कोर्सबद्दल महत्वपूर्ण माहिती दिली. सीएच्या तीन टप्प्यातील होणाऱ्या परीक्षांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीएसटी, सेल्स टॅक्स ,इन्कम टॅक्स, यामध्ये काय फरक आहे व तो कोणाकोणास भरावा लागतो तसेच डिजिटल ऑनलाइन मार्केटिंग व्यवसायाच्या माध्यमातून




वेगवेगळ्या संधी कशा उपलब्ध होतात व विद्यार्थ्यांना त्याचा कशाप्रकारे लाभ होऊ शकतो याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता आजच्या डिजिटल युगात विविध व्यवसाय निवडले पाहिजेत. याविषयीही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उपक्रमास सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच वाणिज्य शाखेतील शिक्षक शशिकांत भोसले, दिलीप पाटील, आरती सिंग या सर्वांचे सहकार्य लाभले. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाविषयी गौरवोद्गार व्यक्त केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थी बनला 'बेस्ट आर्टिस्ट'

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने २०२४ मध्ये देण्यात येणारा एक्सलंट बुक ऑफ रेकॉर्डसचा आर्टिस्ट ऑफ द इयर हा बहुमान मिळवला आहे.

महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील तृतीय वर्षाचा सतेन कुशवाला याने एक्सलंट ऑफ बुक रेकॉर्डचा आर्टिस्ट ऑफ द इयर हा बहुमान मिळवला आहे. या स्पर्धेमध्ये जगभरातील विविध देशातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये त्याने वेगवेगळ्या प्रकारची चित्रे काढून त्याच्या मेहनतीच्या जोरावर हा बहुमान मिळवला आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अकाउंट व फायनान्स विभागातील सर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख त्याचे आई वडील या सर्वांचे त्याला या स्पर्धेसाठी मार्गदर्शन लाभले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## वाजेकर महाविद्यालयाचा अभ्यास दौरा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण फुंडे वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथील प्राचार्य डॉ. पवार यांच्या सहकार्याने व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप घोडके यांच्या पुढाकाराने मुंबई येथील विधिमंडळ, मानवी हक्क आयोग, हुतात्मा स्मारक व उच्च न्यायालय या महत्त्वाच्या अशा प्रेरक ठिकाणी अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता.



अधिवेशनाच्या शेवटच्या सत्रातील अंदाजपत्रकीय चर्चा अनुभवण्याकरिता विविध भागातून आलेले अभ्यासक तसेच फ्रान्सचे संसदीय अभ्यास शिष्टमंडळ याच दिवशी दोन्ही सभागृहात आल्याने विधिमंडळ भेटीबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती. तरीही विधिमंडळ साहाय्यक सचिव प्रवीण देवरे व थिटे यांनी फिरत्या सुरक्षा पथकाच्या सहकार्याने विधिमंडळातील विधानसभा व विधान परिषद कामकाज राज्यशास्त्र विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दीर्घकाळ दाखविले. त्याच वेळेला दोन्ही सभागृहात धूतुम दुर्घटना घटना, भूसंपादन, मुंबई व नवी मुंबईच्या नागरी समस्यांबाबत तसेच वाढत्या व्यसनाधीनतेबाबत सभागृहात उपस्थित चर्चा प्रत्यक्ष पाहण्याचा व ऐकण्याचा आणि मान्यवर आमदार, मंत्री, सभागृह अध्यक्ष यांना थेट पाहण्याचा त्यांच्याशी संवाद साधण्याचा योग या विद्यार्थी चमूला

आल्याने आनंदाच्या वातावरणात सदरची अभ्यास सहल यशस्वी झाली. त्याचप्रमाणे मानवी हक्क आयोग कार्यालयातील डॉ. स्वरूपा डोलम (प्रबंधक) यांनी खूप चांगल्या नियोजनातून मानवी हक्क आयोग कामकाज पद्धती सांगून थेट सुनावणी प्रक्रियेचा अनुभव या राज्यशास्त्र विद्यार्थ्यांना दिल्याने या अभ्यास सहली बबत महाविद्यालय विद्यार्थ्यांमध्ये कौतुकाचे आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. लोकप्रतिनिधी, वकील, पत्रकार व समाजसेवा क्षेत्रात भविष्यात करिअर करू इच्छिणाऱ्या या विद्यार्थ्यांना या अभ्यास दौऱ्याचा लाभ होत असल्याने त्यांनी आमदार महेश बालदी यांच्या मदतीबाबत व प्रा. डॉ. संदीप घोडके सरांच्या सुनियोजनाबाबत अनेकांनी धन्यवाद दिले.

## पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात पाणीपट्टी थकबाकी वसुली मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पाणीपट्टीच्या वसुलीसाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार थकबाकीदार नळकनेक्शन धारकांविरोधात मोहीम सुरू करण्यात आली आहे. गेल्या आठ दिवसापासून ही मोहीम सुरू करण्यात आली असून मोहीम सुरू केल्यापासून सुमारे ७२ लाखांची वसुली करण्यात आली आहे.

पनवेल महापालिका हद्दीत एकुण १६ हजार ७३२ नळ जोडणीधारक आहेत. महापालिकेची पाणी कराची १७ कोटी ९४ लाखाची मागणी असून या आर्थिक वर्षात पाच कोटी ५० लाखाची वसुली झाली आहे. अजूनही १२ कोटी ४४ लाखाची पाणीकर थकबाकी शिल्लक आहे. थकबाकीधारकांना पाणी कर भरणा नोटीसीचे वाटप करण्यात आले आहेत. लाखोंच्या घरात थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या विरोधात पनवेल महानगरपालिकेने





वसुली मोहिम सुरु केली आहे. मोहीम सुरू केल्यापासून सुमारे ७२ लाखांची वसुली झाली आहे. पाणी कर थकबाकीदारांनी भरला नाही तर पाणी कर संकलन विभागांतर्गत नळ जोडणी बंद करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.


पाणी कर थकबाकीधारकांनी त्वरीत पनवेल महापालिका कार्यालयात येउन पाणी कर भरणा करावा अन्यथा कोणतीही पुर्वसूचना न देता नळकनेक्शन बंद करण्याची कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिकेच्या वतीने उपायुक्त गणेश शेटे यांनी केले आहे.

# बॉम्बे टू गोवा @५२

## कुठूनही प्रवास सुरू करावा... मस्त धमाल






उत्कृष्ट विनोदी चित्रपटाची व्याख्या काय? रात्री झोपेत जरी आठवला तरी चेहऱ्यावर मंद स्मित हास्य यायला हवे. सकाळी लवकर उठून त्यातील काही विनोदी प्रसंग यू ट्यूबवर कधी एकदा पाहतोय असं वाटायला हवे. आणि मग संपूर्ण दिवसभर ते धमाल प्रसंग डोळ्यासमोर येत येत आपला मूड फ्रेश रहायला हवा.

बॉम्बे टू गोवा अगदी अस्साच धमाल पिक्चर. कधीही कुठूनही कसाही आणि कितीदाही पहावा मस्त मनोरंजन करतो, नवीन ऊर्जा देतो. 'कॉमेडीचे हवं तेवढे कॅप्सूल' म्हणजेच हा चित्रपट. (जगभरातील अनेक भाषांत असे अनेक विनोदी चित्रपट आहेत. मूकपटापासून ओटीटीपर्यंत हा मजेशीर प्रवास सुरू आहे.)

'बॉम्बे टू गोवा' मुंबईत प्रदर्शित झाला ३ मार्च १९७२ रोजी. तब्बल बावन्न वर्ष झालीदेखील. मेन थिएटर अलंकार होते आणि पिक्चर एन्जॉय करण्यासारखे असल्याने थिएटरवरचा हाऊसफुल्लचा फलक आणि आत हास्याचे फवारे, फुलबाजे कायम राहिले.

तो विनोदवीर मेहमूदचा काळ होता. पिक्चरमध्ये तो हमखास हसवणार याची पब्लिकला हमी होती (आणि तो आपल्यापेक्षा जास्त भाव खाऊन जातो म्हणून अनेक बड्या हीरोंनीच त्याचा आपल्या चित्रपटातून पत्ता कट केल्याचं गॉसिप्स गाजत होते. म्हणून तर मेहमूदच हीरोगिरीकडे वळला.)

'बॉम्बे टू गोवा 'चा निर्माता मेहमूद आणि एन. सी. सिप्पी. त्यांनी 'मद्रास ते पॉन्डेचरी' या १९६६ सालच्या सुपरहिट तमिळ भाषेतील चित्रपटाची रिमेक करायचे ठरवले (चेन्नई शहर त्या काळात मद्रास म्हणून ओळखले जाई.) दिग्दर्शन एस. रामनाथन यांच्याकडे सोपवले. मूळ चित्रपटात नागेश याने रंगवलेली बस कंडक्टरची धमाल भूमिका या चित्रपटात मेहमूदने 'शूटिंगच्या वेळेस त्यात भर घालत घालत रंगवली'. पटकथेनुसार काम करणे काही कलाकारांना योग्य वाटते, तर काही कलाकार एकदा का चित्रपटाची थीम, आपली व्यक्तीरेखा आणि प्रसंग लक्षात आला की त्यात डिशन घेतात. कॉमेडी करणे महाअवघड. भाषेवर आणि टायमिंगवर प्रभूत्व हवे. तेव्हाच त्यांचा विनोद रसिकांपर्यंत पोहचतो. मेहमूद त्यात विनोदवीरांचे विद्यापीठ म्हणून ओळखला जातो आणि 'बॉम्बे टू गोवा'सह त्याने लाखों मे एक, मै सुंदर हू, दो फूल, गरम मसाला, अलबेला (मा. भगवानदादांप्रमाणे मेहमूदचाही 'अलबेला' नावाचा चित्रपट आहे), कुंवारा बाप (मेहमूदच दिग्दर्शक आहे) हे चित्रपट 'आपलेसे केले'. त्याचे म्हणून हे चित्रपट ओळखले जातात.

हिंदी चित्रपटाची सर्वकालीन पहिली ओळख म्हणजे दोन घटका मस्त करमणूक हवी, टाईमपास हवा, छान विरंगुळा मिळायला हवा, अनेक प्रकारच्या व्यक्तीगत ताण तणाव, दुःख, कटकटी यातून मोकळीक हवी, त्याचा विसर पडावा.

हा प्रवासी चित्रपट. अशा पद्धतीचाही चित्रपट असू शकतो. त्यात कधी असा विनोदी मसालेदार मनोरंजक चित्रपट असतो, तर कधी जोया अख्तर दिग्दर्शित 'जिंदगी मिलेगी ना दोबारा'सारखा मैत्रीची धमाल तितकीच भावपूर्ण गोष्ट सांगणारा चित्रपट असतो. अगदी हेमंत ढोमे दिग्दर्शित झिम्मा आणि झिम्मा २देखील एक प्रकारचा प्रवासी चित्रपट. प्रवासी चित्रपटाची उदाहरणे अशी बरीच. प्रवासात अनेक स्वभाव व वयोगटातील माणसे आणि त्यांच्या अनेक प्रकारच्या गोष्टी यावर चित्रपट.

बॉम्बे टू गोवामध्ये रोमान्स, विनोद, रहस्य, गीत संगीत नृत्य, योगायोग, साप, कोंबडी, पिस्तूल अशा अनेक गोष्टींचा जमून आलेला मसाला. आठवला तरी हसू येते हे त्याचे मोठेच यश. 'बॉम्बे टू गोवा'च्या अगोदर पडोसन, साधू और शैतान, प्यार किये जा अशा विविध प्रकारच्या विनोदी चित्रपटांनी उत्तम यश प्राप्त केले असल्याने अशा पठडीतील चित्रपटासाठी रसिकांची उत्सुकता वाढली होती. ('पडोसन'वरून मराठीत विनय लाड याने 'पटली रे पटली', तर 'प्यार किये जा'वरून मराठीत महेश कोठारेने 'धूम धडाका' बनवला.) 'पडोसन' इत्यादींच्या यशाने 'संपूर्ण विनोदीपट' हे समीकरण अधिक एस्टॅब्लिज झाले, अशा चित्रपटांसाठीची रसिकांची मानसिकता व दृष्टिकोन तयार झाला होता आणि या चित्रपटात एक कॉमन फॅक्टर आहे मेहमूद! त्याचा स्वतःचा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला होता. विनोदवीरांना कुठेच कोणी फारसं सिरीयसली घेत नसले तरी ते आपलं काम चोख करतात ही एक परंपरा कायम आहे.

बॉम्बे टू गोवा या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि अरुणा इराणी नायक नायिका असून शत्रुघ्न सिन्हा, किशोरकुमार, मेहमूद, अन्वर अली, ललिता पवार, केश्तो मुखर्जी, मनोरमा, मुकरी, सुंदर, नासिर हुसेन इत्यादींच्याही भूमिका आहेत. राजेन्द्र कृष्ण यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत आहे. देखा ना हाय रे, दिल तेरा है मै भी तेरी हू ही या चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत. आणखी एक विशेष म्हणजे 'बॉम्बे टू गोवा'साठी अमिताभ बच्चनची निवड कशी झाली माहित्येय? खरंतर तेव्हा त्याचा अगदी सुरुवातीचा पडता काळ सुरू होता. सात हिन्दुस्तानी, एक नजर, बन्सी बिरजू वगैरे वगैरे चित्रपट फ्लॉप होत होते, पण याच काळात तो मेहमूदचा भाऊ अन्वर याच्या घरी राहत होता आणि अन्वरने या चित्रपटात ड्रायव्हरची भूमिका साकारली म्हणून अमिताभलाही संधी मिळाली तीदेखील अरुणा इराणीचा नायक म्हणून मिळाली. खरंतर अरुणा इराणी मेहमूदची हुकमी नायिका म्हणून ओळखली जात होती. अरुणा इराणीने बालकलाकार म्हणून या क्षेत्रात पाऊल टाकले. वयात येताना छोट्या छोट्या भूमिका साकारत साकारत वाटचाल करीत असतानाच 'गुनाहों का देवता'मध्ये पहिल्यांदाच मेहमूदसोबत भूमिका मिळाली (त्याच सुमारास रूपेरी पडद्यावरील मेहमूदच्या हुकमी जोडीदार शुभा खोटेचे लग्न झाले, तर मुमताज सहनायिका, प्रमुख नायिका असा प्रवास करीत होती. ती गॅप अरुणा इराणीने भरून निघाली. सिनेमाच्या जगात असे काही होतच असते. कोणती गोष्ट फळेल हे सांगता येत नाही). 'बॉम्बे टू गोवा'त अरुणा इराणी अमिताभची नायिका असेल हा निर्णय मेहमूदचा आणि तो तात्कालिक परिस्थितीतून आलेला). एखाद्या चित्रपटाच्या निर्मीतीत असे अनेक छोटे मोठे घटक गुंतलेले असतात (त्याचेच किस्से होतात) आणि चित्रपट रसिकांना ते जाणून घेण्यात फार इंटरेस्ट असतोच.



पिक्चरमधील बसमधील अमिताभने नाचत नाचत साकारलेले देखा ना हाय रे सोचा ना या गाण्यावर नाचायला त्याला जमेना. नृत्य दिग्दर्शक पी. एल. राज त्याला टेकवर टेक करायला लावत. अखेर तो हैराण झाला आणि मेकअप रूममध्ये जाऊन बसला. मेहमूदने त्याची बरीच समजूत घातली. तरीही तो त्याची विनवणी करीत होता, जमणार नाही. अखेर मेहमूदने एक शक्कल लढवली. अमिताभ तयार होऊन सेटवर येईपर्यंत त्याने अन्य कलाकारांना सांगितले अमिताभचा पहिलाच टेक आम्ही ओके करू आणि तो चांगलाच झाला आहे असे म्हणतच तुम्ही टाळ्या वाजवा. तस्सेच झाले. हे नाटक छान वठले. अमिताभचा आपल्या नृत्याबाबतचा नून्यगंड गेला आणि तो अधिकच आत्मविश्वासाने नृत्य करू लागला. हा किस्सा खुद्द अरुणा इराणीने सांगितला. कलाकार असा घडत असतो असेच म्हणूयात. पिक्चरचे बरेचसे शूटिंग चेन्नईतील (तेव्हाचे मद्रास) विजयवानी स्टुडिओत झाले. मूळ चित्रपटात नसलेला गाडीतून कोंबडी पळाल्याचा प्रसंग ही मेहमूदची कल्पना. तर प्रवासी अनेक प्रकारचे असतात एकादी अशीही (ललिता पवार) हा पंच रंगला. अन्वर गाडी चालवत असतानाच समोर साप येणे, आपण हाती साप घेतलाय हे समजल्यावर मेहमूदची गाळण उडणे असे छोटे छोटे धमाल प्रसंग पाहण्यातही अनेकांचे मस्त मनोरंजन होते. मेहमूद व अन्वर, एक वाहक, एक चालक, एकाचे नाव राजेश तर दुसऱ्याचे खन्ना. एका प्रसंगात गाडीभोवती फेरी मारताना एकमेकांना हाक मारताना राजेश... खन्ना... हा पंच थेटरात प्रचंड धमाल उडवे. पिक्चरमधला मुंबई-गोवा प्रवास असा कधीही, केव्हाही, काहीही घडू बिघडू शकते या गोष्टींनी रंगला.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

तुम्हाला कदाचित कल्पना नसेल, पण 'जंजीर' (१९७३) साठी इन्स्पेक्टर विजयच्या भूमिकेसाठी अमिताभ बच्चनचे नाव पटकथा संवाद लेखक सलिम जावेद यांनी सुचवले असता दिग्दर्शक प्रकाश मेहरानी 'बॉम्बे टू गोवा' पाहून अमिताभची निवड केली. यातील त्याचा स्क्रीन प्रेझेंस आणि मारहाण दृश्यातील आत्मविश्वास पाहून प्रकाश मेहरा इम्प्रेस झाले आणि लगोलग त्यांनी अमिताभची निवड केली. या चित्रपटाचे हे देणे खूप महत्त्वाचे आहे. एकाद्या चित्रपटाबाबत असेही काही वेगळे घडत असते. सिनेमाची दुनिया ही अशी बहुरंगी, बहुढंगी. सत्तरच्या दशकात हा चित्रपट त्यानंतर रिपीट रन आणि मॅटीनी शोला पुन्हा पुन्हा प्रदर्शित होताना अनेकांनी तो पुन्हा पुन्हा पाहून एन्जॉय केला. ऐंशीच्या दशकात या चित्रपटाची व्हिडीओ कॅसेट उपलब्ध होऊ लागली आणि आता पुढील पिढीतील चित्रपटरसिकांना आवडू लागला. यातील विनोद कालबाह्य झाले नाही. असे करता करता हा चित्रपट आणखी काही पिढ्या ओलांडूनही तितकाच आनंद देत राहिला. आणि देखा है रे हे गाणे जनसामान्यांच्या पिकनिकमध्ये हुकमी असल्यानेही या चित्रपटाची ओळख कायम राहिली. म्हणूनच चित्रपटात गाणी हवीत ती एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यांत नेत असतात.

पुन्हा एकदा बॉम्बे टू गोवा (२००७) या नावासह अशाच पठडीतील चित्रपट आला, पण तो मूळ चित्रपटाची ओळख आणि व्यक्तिमत्व यांचा विसर पाडण्यात यशस्वी ठरला नाही. २००७ साली हा चित्रपट पडद्यावर आला. राजू पेडणेकर दिग्दर्शित या चित्रपटात शक्ती कपूर, टीनू आनंद, दिनेश हिंगू, राजू श्रीवास्तव, सुनील पाल, नवीन प्रभाकर, पेंटल, संजय मिश्रा, विजयराज, असरानी, एहसान कुरेशी, असिफ शेख, विजू खोटे, ज्युनियर मेहमूद इत्यादींच्या भूमिका आहेत. सचिन पिळगावकरने याच 'बॉम्बे टू गोवा'ची नवरा माझा नवसाचा या नावाने रिमेक केली. चित्रपटाचा क्लायमॅक्स गणपतीपुळे येथे होतो, पण हाही चित्रपट म्हणावा तसा जमला अथवा रंगला नाही. मूळ चित्रपटाचे व्यक्तिमत्व त्याच्या रिमेकला येणं शक्यही नव्हतेच म्हणा. इतकेच नव्हे तर आता 'नवरा माझा नवसाचा २' असा सिक्वेल येतोय. या सगळ्यात एक महत्त्वाचं रसिकांची पिढी बदलली तरी बॉम्बे टू गोवाच विविध माध्यमातून (डिजिटल पिढी यू ट्यूबवर आनंद घेत आहे) पाहत असताना त्याची चक्क नक्कल कोण हो पाहिल? अगदी कानडी भाषेतही एकान्दथा या नावाने रिमेक करण्यात आली आणि त्यातही रंगत आली नाही. याचं कारण मेहमूद हा हुकमाचा एक्का होता. त्याला 'चित्रपटातील कॉमेडी म्हणजे काय?' याचं भान होते. व्यक्तिगत आयुष्यातील दुःख विसरून जनसामान्यांना लोटपोट हसवणे त्याचा हेतू होता.

आजच्या ओटीटीच्या युगात वेगवेगळ्या निमित्ताने मल्टीप्लेक्समध्ये जुने चित्रपट प्रदर्शित होताहेत. कालची आणि आजची पिढी त्याला गर्दी करतेय. तर मग होऊन जाऊ दे मेहमूदच्या धमाल पिक्चर्सचा एक महोत्सव. त्याच्या अनेक प्रकारच्या व्यक्तीरेखा, गेटअप, विनोदाचे टायमिंग आणि कधी गीत संगीत व नृत्यातील रंगत पहायला मिळेल आणि असाच एक विनोदी चित्रपटांचाही महोत्सव होऊ देत. त्यात मेहमूदच्या काही पिक्चर्ससह चलती का नाम गाडी, दो दुनी चार, बावर्ची, चुपके चुपके, अंगूर असे अनेक चित्रपट एन्जॉय करता येतील. एक मस्त सेलिब्रेशन होईल. पिक्चर पाहणे हा आनंद सोहळाच तर असतो...

# खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे घातक आजार, अकाली मृत्यूमध्ये मोठी वाढ

देशात झपाट्याने वाढत असलेले गंभीर आजार आणि अकाली मृत्यू यांनी चिंताजनक आकड्यांना पार केले आहे. आधुनिक जीवनशैली, यांत्रिक संसाधनांवर वाढते अवलंबित्व, प्रदूषण आणि खाण्या-पिण्याचा बदलत्या सवयी यामुळे आपल्या जीवनात बरेच वाईट बदलदेखील झाले आहेत. आरोग्यानुसार नव्हे; तर चवीनुसार पदार्थ खाणे सर्वांनाच आवडते, ज्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो.

आता कोणालाही कोणत्याही वयात कोणतीही आरोग्य समस्या होत आहे. लोकांच्या वाढत्या मागणीनुसार आता फास्ट फूड, स्ट्रीट फूड, तेल, मैदा, मसाले, खारट, गोडयुक्त पदार्थ सर्वत्र मोठ्या प्रमाणात समृद्ध होत आहेत. जेव्हाकी हे पदार्थ गुणवत्तेत कमी दर्जाचे असून वाईट कोलेस्टेरॉल आणि लठ्ठपणा वाढवण्यात मोठी भूमिका बजावतात. भारतीय सण, समारंभ, पार्टी आणि शुभ कार्यांमध्येदेखील अशाच प्रकारचे पदार्थ वाढले जातात. त्याचप्रमाणे अन्नपदार्थांमध्ये घातक रसायनांचा वापर, भेसळ आणि अस्वच्छता मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. शिवाय हे कमी दर्जाचे खाद्यपदार्थ फक्त चवीसाठी असून त्यात जास्त कॅलरी असतात. बरेच लोक जेवताना किती कॅलरीज घेत आहेत याचा विचारही करीत नाहीत. पोट पूर्ण भरेपर्यंत जेवतात तसेच आपल्याकडे पाहुणचाराच्या नावाखाली होणारी आपुलकीची मेजवानीपण या समस्याला वाढविते.

आपण घेतलेल्या कॅलरीज खर्च केल्या नाहीत, तर त्या अतिरिक्त कॅलरीज शरीरात जमा होतात आणि लठ्ठपणासोबतच अनेक जीवघेण्या आजारांनादेखील निर्माण करतात. पचनास जड, थकवा, जडपणा आणि आळस निर्माण करणारे अन्नपदार्थ जास्त प्रमाणात सेवन केले जाते. त्यामुळे पोटाशी संबंधित आजारांची समस्या देशभरात सर्रास दिसून येत आहे. लठ्ठपणाची समस्या सातत्याने वाढत आहे, जी अनेक घातक आजारांची जननी आहे आणि किती दुर्दैवाची गोष्ट आहे की, सर्व काही माहीत असूनही आपण स्वतःच अनारोग्यकारक पदार्थ खाणे पसंत करतो.

लठ्ठपणाच्या जोखमींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि जागतिक लठ्ठपणाचे संकट संपवण्यासाठी दरवर्षी ४ मार्च रोजी जगभरात जागतिक लठ्ठपणा दिन पाळला जातो. अनारोग्यकारक खाण्याच्या सवयींबरोबरच शारीरिक हालचालींचा अभाव, पुरेशी झोप न मिळणे, अति ताणतणाव, आजार, अनुवंशिकता, औषधांचे दुष्परिणाम, सभोवतालचे वातावरण हेही जास्त वजन आणि लठ्ठपणाच्या जोखमीला कारणीभूत आहे. गोड पेये आणि प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ यासारख्या उच्च-कॅलरी पदार्थांचे सेवन हे शहरांमधील लठ्ठपणाच्या या प्रवृत्तीमध्ये मोठे योगदान असल्याचे मानले जाते आणि तसेच त्यांच्यात आवश्यक पोषक आणि फायबरची तीव्र कमतरता असते. दारू पिणे, व्यसनाधीन होणे, वारंवार बाहेर खाणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. दीर्घकाळ धूम्रपान, अस्वस्थ आहार आणि शारीरिक निष्क्रियता यामुळे रोगाचा विकास होतो. विशेषतः हृदयविकार, पक्षाघात, मधुमेह, लठ्ठपणा, मेटाबॉलिक सिंड्रोम, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी व इतर. भारतीय फास्ट-फूड मार्केट अंदाजे २७.५७ बिलियन डॉलर आहे. समोसे, कचोरी, ब्रेड पकोडा, पॅकबंद भुजिया, इन्स्टंट नूडल्स, मोमोज, टिक्की, भटुरे हे खाद्यपदार्थ भारतीय जंक फूडच्या यादीत अग्रस्थानी आहेत. जागतिक अन्न बाजारपेठेत भारताच्या सतत एकीकरणानंतर अस्वास्थ्यकर,



प्रक्रिया केलेले अन्न अधिक सुलभ झाले आहे. हे वाढत्या मध्यमवर्गीय उत्पन्नासह, मध्यमवर्गीय आणि उच्च उत्पन्न असलेल्या कुटुंबांमध्ये दरडोई सरासरी कॅलरी सेवन वाढवत आहे. एका विशेष अहवालानुसार, देशातील मोठ्या शहरांमधील फास्ट फूड रेस्टॉरंट्सवरील मध्यमवर्गीय कुटुंबांचा वार्षिक खर्च २०२२पर्यंत १०८ टक्क्यांनी वाढला आहे.

ओबेसिटी ॲटलस २०२३ने स्थूलतेच्या बाबतीत १८३ देशांपैकी भारताला असंसर्गजन्य रोग म्हणून ९९व्या स्थानावर ठेवले आहे. नॅशनल हेल्थ फॅमिली सर्व्हे ५च्या आकडेवारीनुसार बीएमआई निकषांनुसार २३% महिला आणि २२.१% पुरुषांचे वजन जास्त आहे. देशातील ४० टक्के महिला आणि १२ टक्के पुरुषांना पोटाच्या लठ्ठपणाचा त्रास आहे. भारतीय राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४नुसार २००६ ते २०१६ या कालावधीत १५ ते ४९ वयोगटातील महिलांमधील लठ्ठपणा १३%वरून २१%पर्यंत वाढला आहे आणि १५ ते ४९ वयोगटातील पुरुषांमधील लठ्ठपणा ९.३%वरून १९%पर्यंत वाढला. बहुतेक भारतीयांचा दरवर्षी हृदयविकारामुळे मृत्यू होतो आणि त्यापैकी सुमारे ६०% लोकांना मधुमेह आहे. असा अंदाज आहे की, २०५०पर्यंत १३० दशलक्षांपेक्षा जास्त रुग्णांसह भारत मधुमेहामध्ये जगात आघाडीवर असेल.

'डब्ल्यूएचओ'च्या मते १९७५पासून जगभरात लठ्ठपणा जवळजवळ तिप्पट झाला आहे. २०१६मध्ये १८ आणि त्याहून अधिक वयाच्या १.९ अब्जाहून अधिक प्रौढांचे वजन जास्त होते, यापैकी ६५० दशलक्षाहून अधिक लोक लठ्ठ होते. जगातील बहुतेक लोकसंख्या अशा देशांमध्ये राहते जेथे जास्त वजन आणि लठ्ठपणामुळे कमी वजन असलेल्या लोकांपेक्षा जास्त मृत्यू होतात. २०२०मध्ये पाच वर्षांखालील ३९ दशलक्ष मुले जास्त वजन किंवा लठ्ठ होती. २०१६मध्ये ५-१९ वयोगटातील ३४० दशलक्षाहून अधिक मुले आणि किशोरवयीन मुलांचे वजन जास्त किंवा लठ्ठ होते. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या (फाओ) २०२३च्या अहवालानुसार अस्वास्थ्यकर आहारामुळे होणारे लठ्ठपणा आणि असंसर्गजन्य रोगांमुळे कामगार उत्पादकतेत शेकडो अब्ज डॉलर्स खर्च होत आहेत आणि अस्वास्थ्यकर आहार पद्धतींशी संबंधित अंदाजे हानीच्या बाबतीत भारत १५४ देशांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे, जे खूप चिंताजनक आहे. २०११पासून भारतात वापरल्या जाणाऱ्या अल्ट्रा प्रोसेस्ड अन्नाचे एकूण प्रमाण ९०%पेक्षा जास्त वाढले आहे.

प्रौढ बॉडी मास इंडेक्स किंवा बीएमआय इंडेक्सनुसार जर तुमचा बीएमआय १८.५ ते २४.९ असेल, तर ते निरोगी वजन श्रेणीत येते. जर तुमचा बीएमआय २५.० ते २९.९ असेल, तर तो जास्त वजनाच्या श्रेणीत येतो. उंचीनुसार वजन असावे. कर्बोदके, बटाटे, भात, मिठाई यासारखे पदार्थ वजन वाढण्यास जबाबदार असतात. म्हणून फक्त तेच पदार्थ खा जे तुमच्या शरीरात अतिरिक्त कॅलरी जोडणार नाहीत. कॅलरीजची आदर्श पातळी रोजच्या आहाराव्यतिरिक्त वय, चयापचय आणि शारीरिक हालचालींवर अवलंबून असते. साधारणपणे महिलांसाठी दररोज २००० कॅलरीज आणि पुरुषांसाठी २२५०० कॅलरीजची शिफारस केली जाते.

शहरांतील प्रदूषणात गुदमरणारा श्वास, सर्वत्र भेसळ, पॅकबंद अन्न, अन्नपदार्थांचा निकृष्ट दर्जा आणि त्यात जीवनावश्यक पोषक घटकांचा तीव्र तुटवडा, पिकांमध्ये घातक रसायनांचा वापर, व्यायामाचा अभाव, यांत्रिक उपकरणांवरचे वाढते अवलंबित्व यामुळे आरोग्य खराब होऊन मानवी जीवन उद्ध्वस्त होत आहे, त्यामुळे जीवघेणे आणि महागड्या आजारांमुळे अकाली मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. मनुष्याने स्वतःला अशा उंबरठ्यावर आणले आहे जिथे आरोग्याच्या समस्यांचा ढीग आहे, ज्यामध्ये लठ्ठपणादेखील प्रमुख आहे. लठ्ठपणा टाळता येतो, योग्य दैनंदिन दिनचर्येतून आपण चांगले आरोग्य मिळवू शकतो. मीठ, साखर, मैदा यांसारख्या पदार्थांना स्लो व्हाईट पॉयझन म्हणतात, त्यांचे अतिसेवन टाळा. पॅकेज केलेले डबाबंद खाद्य, फास्ट फूड, जंक फूड, प्रक्रिया केलेले फॅटी मांस, स्नॅक फूड, फ्रोझन फूड, बाहेरचे तेलकट मसालेदार पदार्थ खाणे टाळा. पोषक तत्वांनी भरपूर फळे, अंकुरलेले धान्य, हिरव्या भाज्या, कडधान्ये, तृणधान्ये वापरा. रोजच्या आहारात खाद्यपदार्थांचा दर्जा आणि कॅलरीजवर लक्ष द्या. अस्वास्थ्यकर आहारात जिभेवर ताबा ठेवायला शिका, पोटाला कोठार समजून त्यात काहीही भरू नका, इच्छाशक्ती प्रबळ करा. शरीराला प्रत्येक वयात सर्व प्रकारच्या आवश्यक पोषक तत्वांची गरज असते याची विशेष काळजी घ्या. शुद्ध ऑक्सिजन, पौष्टिक आहार, पुरेशी झोप, रोजचा व्यायाम, व्यसनापासून दूर राहणे हे उत्तम आरोग्याचे मार्ग आहेत. याच्या मदतीने आपण केवळ लठ्ठपणापासूनच नाही, तर जीवघेण्या आजारांपासूनही दूर राहू आणि आनंदी, निरोगी जीवन जगू.

**-डॉ. प्रितम भि. गेडाम**

# वरसे ग्रामपंचायत हद्दीत लोककल्याणकारी योजना राबविणार -खासदार सुनील तटकरे



**रोहे : प्रतिनिधी**

पुढच्या कालावधीत निवडणुकीनंतर लोक कल्याणकारी योजना, व्यक्तीगत योजना, महिला बचत गटांसाठी विविध योजना या ग्रामपंचायतमध्ये राबविणार असल्याचे वरसे ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

या वेळी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी उपसभापती अनिल भगत, महीला तालुका अध्यक्ष प्रितम पाटील, सुरेश महाबळे, सरपंच अमित मोहीते, उपसरपंच शांतीशील तांबे, नरेश पाटील, रामाशेठ म्हात्रे, मनोहर सुर्वे, गणेश शिवलकर, मृणाल शिवलकर, तुषार शिंदे, पुर्वा शिंदे, अपर्णा पाटील, उध्देश कांबळे, अतिष पडवळ, सारिका नाक्ती, सारिका दळवी, अशोक मोरे, सुधाकर वालेकर, मनोहर सकपाळ आदी उपस्थित होते.

वरसे ग्रामपंचायतीचे नागरीकरण वाढले. नवीन इमारती उभ्या राहिल्या आहेत. ५५ लीटर माणसी पाणी देण्यासाठी प्रयत्न करत आहोत. घन कचरा मोठ्या प्रमाणात निर्माण होत असताना त्याचे विल्हेवाट लावण्यासाठी प्रक्रीय केंद्र उभे केले. यासाठी मी व ना. आदिती तटकरे यांनी प्रयत्न केले.

अंतर्गत रस्ता झाले. या ग्रामपंचायतीमध्ये कालबध्द विकास काम होत आहेत. दरवर्षी जिल्हा नियोजन मंडळातून ८० ते ८५ लाखाचे काम या ग्रामपंचायत मध्ये होत असतात. लेक लाडकी अभियान ना. आदिती तटकरे यांच्या माध्यमातून राज्यात सुरू होत असताना आम्हाला आनंद होत आहे. महीला बचत गटाची चळवळ आपण सर्वांनी उभी करुया, असेही खासदार तटकरे म्हणाले.

या वेळी प्रास्ताविकात मधुकर पाटील यांनी खासदार सुनील तटकरे, ना. आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांचे ग्रामपंचायतीकडे विशेष लक्ष आहे. ग्रामपंचायत विस्ताराने मोठी असल्याने अनेक समस्या वाढत असतात. पाण्याची वाढती गरज पहात आपण यासाठी सहकार्य करत असल्याचे सांगत आगामी लोकसभा निवडणुकीचे उमेदवार सुनील तटकरे असतील यात कोणतीही दुमत नाही. या निवडणुकीत मताधिक्य मिळणार असल्याचे शेवटी सांगितले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सतिश भगत यांनी केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार -धैर्यशील पाटील





**पेण : प्रतिनिधी**

शिक्षक बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी सेवानिवृत्त शिक्षक बांधवांच्या सत्कार समारंभ व मेळाव्यात केले. अखिल रायगड जिल्हा सेवा निवृत्त प्राथमिक शिक्षक कर्मचारी संघाची सभा जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आगरी समाज विकास मंच पेण येथे घेण्यात आली.

या वेळी गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ, अखिल मराठी राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष देविदास बसवते, शैलेश पाटील मंगेश म्हात्रे, इंद्रजित पुरोहित, अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे कोकण विभाग अध्यक्ष प्रमोद पाटील तालुका अध्यक्ष तथा राज्य प्रतिनिधी रविकांत ठाकूर नांदेडचे माजी गटशिक्षणाधिकारी अशोक पोवळे प्रभू सावंत, राजेश पाटील, जितेंद्र निंबाळकर, नारायण पेटके, किशोर मोरे, राज्य प्रतिनिधी अविनाश म्हात्रे जिल्हा सरचिटणीस गुरुनाथ पाटील कार्याध्यक्ष प.जा. म्हात्रे जिल्हा उपाध्यक्ष स. रा. म्हात्रे खोपोली नगरपालिका विभाग अध्यक्ष कृष्णा मोकल, पनवेल तालुकाध्यक्ष नरेश पाटील, उरण तालुका अध्यक्ष अभिमन्यू गावंड, महिला प्रतिनिधी उज्वला निकम, शुभदा दातार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या वेळी सेवानिवृत्त शिक्षकांचा तसेच ८० वर्षे झालेल्या बांधवांचा शाल श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका पदाधिकारी व सभासदांनी मेहनत घेतली.

## निवडक

### विज्ञान दिनानिमित्त उपक्रम



**रोहे :** तालुक्यातील एम.बी. मोरे फाउंडेशनचे कला वाणिज्य विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव येथील रसायनशास्त्र आणि वनस्पती विभागामार्फत बुधवारी ३७वा 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त महाविद्यालयात 'विज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा' आणि वनस्पतीशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींनी प्रदर्शन आयोजित केले. सोल्वय कंपनीच्या प्रयोगशाळा अधीक्षक रुपाली यादव यांना बक्षीस वितरणाला विशेष अथिती म्हणून निमंत्रित करण्यात आले. रसायन शास्त्रच्या विभाग प्रमुख प्रा. प्रतिमा भोईर, वनस्पती विभाग प्रमुख प्रा. दीपाली वारंगे, प्रा नंदिनी जोशी, प्रा. योगिता नेहेते, प्रा.निकिता महाडिक, प्रा. मयुरी लहाने आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

### जांभिवली शाळेत स्नेहसंमेलन



**खोपोली :** रायगड जिल्हा परिषद शाळा जांभवली येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय गायकर व पोलीस अंकुश म्हात्रे तसे दशरथ गावडे यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सभासद यांचे स्वागत करण्यात आले तसेच सर्व पालक वर्गांचेदेखील स्वागत करण्यात आले. केंद्रस्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेतील नंबर आलेल्या विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समिती कडुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थ्यांना कै. पै. शिवाजी राळे विद्या विकास व क्रीडा प्रतिष्ठान कोये यांच्यामार्फत सन्मानचिन देण्यात आले. सूत्रसंचालन शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा सानप यांनी केले तर आभार उपशिक्षिका संध्या लोणकर यांनी मानले.

### विज्ञान दिन उत्साहात साजरा

**मुरूड :** सर एस ए हायस्कूल व स्व.म.ल. दांडेकर कनिष्ठ



महाविद्यालय व मार्निंग स्टारप्रायमरी तर्फे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात थोर भारतीय शास्त्रज्ञ डॉ.सी.व्ही.रामन यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक - सरोज राणे व सुनील गावडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन उद्घाटन करण्यात आले. या वेळी मुख्याध्यापक सरोज राणे,राहूल वर्तक, संदेश चोरघे, महेंद्र घाटवळ, पर्यवेक्षक सुनील गावडे, बालाजी घुगे, समिक्षा डोंगरीकर व दिपक पालशेतकर तसेच संचालक पांडुरंग आरेकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### गुरूकुल शाळेत विज्ञान दिन

**मोहोपाडा :** चौक येथील श्रीस्वामीनारायण गुरुकुल



आंतरराष्ट्रीय शाळेचे संचालक परमपूज्य श्री विश्वमंगलदासजी स्वामीजी व ब्रम्हस्वरूपदासजी स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्या आला. विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण प्रकल्प सादर केले. या सर्व प्रकल्पांचे प्रदर्शन भरवून विज्ञान विषयातील संकल्पनांचे चित्रे व प्रात्यक्षिकांद्वारे बाल वैज्ञानिकांचे भावविश्व उलगडले.

# श्री क्षेत्र रामदास पठार येथे समर्थ रामदासस्वामींचा पुण्यतिथी सोहळा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

श्री क्षेत्र रामदासपठार येथील सुंदरमठ आनंदवनभुवन येथील समर्थ रामदासस्वामींच्या ३४३ व्या पुण्यतिथी सोहळ्याचा शुभारंभ २७ फेब्रुवारीपासून सदगुरू अरविंदनाथ महाराज यांच्या हस्ते ब्रह्मध्वज पूजनाने झाला असून येत्या सोमवारी (दि. ४) दि. दासनवमीनिमित्त राज्याच्या महिला व बालविकासमंत्री ना. अदिती तटकरे यांच्यासह महाड विधानसभा मतदार संघाचे आ.भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई महापालिकेतील माजी नगरसेविका राखी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दासनवमी सोहळयास महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, सहायक धर्मादाय आयुक्त पी.आर. सातव, पनवेल महानगरपालिका मुख्य अभियंता संजय जगताप, महाड सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेश नामदे व उपअभियंता सनारकर तसेच कनिष्ठ अभियंता प्रज्ञा खंडारे, महाड औद्योगिकचे सहायक पोलीस निरिक्षक मारूती आंधळे, महाड पं.स. पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता विनोद माहुरे, मरामापमं महाडचे आगारव्यवस्थापक रितेश फुलपगारे, चार्टर्ड अकाऊंटंट सदगीरे, पुणे येथील उद्योजक किसन भोसले, विनती कंपनीचे असिस्टंट जनरल मॅनेजर कृष्णा पवार आदींची उपस्थिती लाभणार आहे.

दासनवमी महोत्सवानिमित्त शिवथरघळ सुंदरमठ परिसरामध्ये मंगल पहाट आरती, मनाचे श्लोक, दासबोध पारायण, प्रवचन आणि दुपारचे किर्तन, अन्नदान, महिलांचे भजन, हरिपाठ, रात्रीचे किर्तन आणि हरिजागर असे दररोज कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मंगळवारी (दि. ५) सकाळी ११ वाजता श्रीगुरूदेव अरविंदनाथ महाराजांचे प्रवचन झाल्यानंतर श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या पादुकांची ग्रामप्रदक्षिणा रामदासपठार येथे होणार आहे.

# आज राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

**रायगड :** जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण रायगड जिल्ह्यात रविवारी (दि. ३) राष्ट्रीय पल्स पालिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून या माहिमेत ० ते ५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ लसीचा जादा डोस देण्यात येणार आहे. ० ते ०५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ लसीचा जादा डोस पाजून लसीकरण मोहिम कार्यक्रमात सहभागी होवून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. (प्रभारी) सत्यजीत बडे यांनी केले आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील अपेक्षित लाभार्थी एक लाख ७३ हजार ८५४ त्याकरीता ग्रामीण भागात दोन हजार १०९ बुथ व शहरी भागात १४३ बुथ असे एकूण दोन हजार २५२ बुथवर पोलिओ डोस देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त रेल्वेस्थानक व ग्रामीण भागात १३७ ट्रान्झीट टीम व शहरी भागात ३३० अश्या एकुण ४६७ ट्रान्झीट टीमद्वारे सुध्दा पोलिओ डोस देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामीण भागात १४२ मोबईल टीम व शहरी भागात १२ अश्या एकुण १५४ मोबईल टीमद्वारे सुध्दा पोलिओ डोस देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमाकरीता पाच हजार ६७ आरोग्य कर्मचाऱ्यांची बुथवर नेमणूक करण्यात आली होती तसेच लसीकरणाच्या दिवशी एकुण ४५० सुपरवायझर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे, व नंतर आय.पी.पी.आय करीता एकुण एक हजार १४३ सुपरवायझर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# मुरूड येथे सागर सुरक्षा दलाची बैठक



**मुरूड : प्रतिनिधी**

समुद्रात होणाऱ्या संशयित हालचालीबाबत माहिती तत्काळ पोलिसांना प्राप्त व्हावी यासाठी सागर सुरक्षा दलाची मुरूडमध्ये बैठक घेण्यात आली होती.

१९९३मध्ये मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटासाठी वापरण्यात आलेली स्फोटके ही रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी गावाच्या, समुद्र किनारी उतरवून वाहनाने मुंबई येथे नेण्यात आली. सन २००८मध्ये पाकिस्तानमधील दहशतवाद्यांनी मासेमारी बोट हायजॅक करून समुद्रामार्गे मोठ्या प्रमाणात शस्त्रे व दारूगोळा. नेवून गेट वे ऑफ इंडीया, मुंबई येथे उतरून मुंबईवर हल्ला केला.

रायगड जिल्हाची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता तसेच सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने गुप्तचर यंत्रणेकडुन वारंवार प्राप्त होत असलेल्या सतर्कता संदेशान्वये समुद्रमार्गे राष्ट्रविघातक शक्तींचा घुसखोरीचा धोका वाढलेला आहे. रायगड जिल्हयाचा समुद्र किनारा हा मुंबईच्या लगत असल्याने घुसखोरीस अत्यंत संवेदनशील आहे. अशा दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी, सागरी / खाडी किनारी भागातील लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. सागरी सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्याकरीता सर्व सागरी उपविभागात सागरी व खाडी किनारी पोलीस ठाणे हददीतील सागर रक्षक दलातील सदस्यांचा मेळावे घेण्यात येतात. समुद्रात होणाऱ्या संशयित हालचालीबाबत माहिती तत्काळ पोलिसांना प्राप्त व्हावी यासाठी सागर सुरक्षा दलाची मिटिंग घेतली जाते.

मुरूड पोलीस ठाण्यात या मीटिंगचे आयोजन उप विभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी, पोलीस निरीक्षक नीता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले होते. या मिटिंगसाठी मुरूड पोलीस ठाणे हद्दीमधील ४५ सागर सुरक्षा दलाचे सदस्य, विविध मच्छिमार सोसायटी चेअरमनसुद्धा उपस्थित होते.

पोलीस अधिकाऱ्यांनी समुद्रात होण्याऱ्या दुर्घटना तसेच संशयास्पद हालचालींवर नजर ठेवून त्याची माहिती वेळोवेळी पोलिसांना देण्यात यावी. जेणेकरून दुर्घटना टळू शकेल. मच्छिमारांनी सतर्क रहावे व संशयित हालचालीवर लक्ष केंद्रित करावे पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले. मच्छिमार संस्थांनीसुद्धा समस्या मांडल्या. राजपुरी येथील महालक्ष्मी मच्छिमार सोसायटीचे चेअरमन विजय गीदि, सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले, उपाध्यक्ष मनोहर मकु आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-सांगटोली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ६/२ अ | १-२६-२० पैकी ०-२०-०० | २५.७० | श्री. मेघनाथ पाडूरंग पालकर<br>श्री. मंगेश पाडूरंग पालकर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.

दि. ०२/०३/२०२४

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१


# उतेखोल शाळेत वृत्तपत्र वाचनालय सुरू



**माणगाव : प्रतिनिधी**

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून माणगावमधील प्रसिद्ध ज्ञानम क्लासचे संचालक गजानन प्रदीप मोने व प्रवीण प्रदीप मोने या दोन भावंडांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल या शाळेत वृत्तपत्र वाचनालय सुरू करून दिले.

याअंतर्गत यांनी वाचनासाठी उपयुक्त असे वाचन स्टँड आणि पाच वृत्तपत्र सुरू केली. २१ व्या शतकात सध्या मोबाईलचे प्रस्थ वाढत चाललेले आहे त्यामुळे वाचनाकडे मुलांचे तसेच पालकांचे दुर्लक्ष होत आहे. या गोष्टीवर विचार करून मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींचे विद्यार्थ्यांना ज्ञान व्हावे त्याचप्रमाणे विद्यार्थी चौकस व्हावा, त्याच्या सामान्य ज्ञानामध्ये भर पडावी याकरिता मोने बंधूंनी वाचाल तर वाचाल या उक्तीला प्रमाण मानून सुरू केलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. कांचनगंगा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एल.एस. जंगम व मुख्याध्यापक अमोल जंगम यांनी मोने बंधूंचे आभार मानले.

या वृत्तपत्र वाचनालयाचा विद्यार्थ्यांना उपयोग होणार असून मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून वाचन चळवळीसाठी समाजामधून मोठ्या स्तरावर असे उपक्रम सुरू व्हावेत, अशी आशा व्यक्त केली आहे.


## पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | SAI SHASTRA CO-OP.HSG.LTD.,Plot No.27, Sector-11, Kharghar- 410210 | ०२ नारळ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील SAI SHASTRA CO-OP.HSG.LTD., Plot No.27, Sector-11, Kharghar या सोसायटीच्या आवारातील ०२ नारळ झाडे असुन, ते धोकादायक पडण्याच्या स्थीतीत आहेत. |
| २. | SATLAJ RESIDENCY CO-OP.HOUSING SOCIETY LTD.,Plot No.8/8B, Sector-35, Kamothe-410209 | ०३ पाम झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील SATLAJ RESIDENCY CO-OP.HOUSING SOCIETY LTD.,Plot No.८/८B, Sector-३५, Kamothe या सोसायटीच्या आवारातील ०३ पाम झाडे असुन, ती धोकादायक पडण्याच्या स्थीतीत व इमारतीच्या संरक्षक भिंतीला धोका निर्माण करत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र. २९७/१२३/२०२४**
**दिनांक :- ०२/०३/२०२४**

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# कुवेतच्या जेलमधून भारतीयांची सुटका

## ऑल इंडिया सीफेरर्स युनियनच्या कामगिरीचे कौतुक

**पनवेल : वार्ताहर, नवी मुंबई : बातमीदार**

अविष्कार जगताप आणि निवृत्ती बागुल या दोन तरूणांसाठी ऑल इंडिया सिफेरर्स युनियनने पूढाकार घेतला होता. कुवेतच्या जेलमधून भारतीयांची सुटका करण्यात ऑल इंडिया सीफेरर्स युनियनने यशस्वी प्रयत्न केले. त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात येत आहे.

हे दोन तरूण ११ डिसेंबर २०२३ या दिवशी ईराण येथे शिपवर गेले होते. अशा नवीन तरूणांना शिपवर पाठवतो असे सांगून त्यांना सेल्फ ईमायग्रेशन (POE)च्या माध्यमातून ईराण येथे पाठवण्यात आले होते. त्यांच्यासारखे शेकडो भारतीय नाविक अजूनही इराण, मलेशिया, दुबई किंवा सौदी अरेबियासारख्या देशांमध्ये अडकले आहेत कारण त्यांची शिपिंग एजंटांकडून फसवणूक झाली आहे. अनेकदा बोगस एजंट्सच्या जाळ्यात अडकलेल्या खलाशांना धोकादायक वातावरणात काम करण्यासाठी जहाजावर चढल्यानंतर त्यांचे पासपोर्ट आणि इतर कागदपत्रे जबरदस्तीने सरेंडर करावी लागतात. त्यांनी आवाज




उठवला की त्यांच्यावर मारहाण केली जाते, मात्र या भोंगळ खलाशांना गुलामगिरीत ढकलून मोठी कमाई करणाऱ्या या बोगस दलालांवर कारवाई करण्यास कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा कचरतात.

कुवेतच्या किनाऱ्यावर १९ जानेवारी रोजी इराणी ध्वजवाहू मालवाहू जहाज 'बहारेह' बुडाले. सात नाविक ज्यात नाशिकचे दोघेजण होते - अविष्कार जगताप (वय २०), निवृत्ती बागुल (वय २५) आणि पाच इराणी तेव्हा जहाजावर होते ते बुडाले. अविष्कार आणि निवृत्ती हेच बचावले आणि बोटीतून पळून जाण्यात यशस्वी झाले. कुवेत अधिकाऱ्यांनी त्यांना रुग्णालयात नेले, परंतु नंतर त्यांना ताब्यात घेतले.

या दुर्घटनेत त्यांचे पासपोर्ट आणि इतर महत्त्वाची कागदपत्रे हरवल्याचे आम्हाला सांगण्यात आले होते. त्यांच्याकडे संबंधित कागदपत्रे नसल्याने अधिकाऱ्यांनी त्यांना कुवेतमधील तुरुंगात ठेवले होते, असे अविनाश या चुलत भाऊ म्हणाले. अविनाश, एजंटच्या म्हणण्यानुसार, साहिल पवार याने अविष्कार आणि निवृत्ती यांना १ डिसेंबर रोजी फसवणूक करून दुबईला पाठवले. कोणाशी संपर्क साधावा हे आम्हाला माहित नाही, तो पुढे म्हणाला. दोघेही गरीब शेतकरी कुटुंबातील आहेत. अविनाश म्हणाले की, त्यांनी मदतीसाठी ऑल इंडिया सीफेरर्स युनियनशी संपर्क साधला, जे त्यांच्या तत्काळ सुटकेसाठी अधिकाऱ्यांकडे गेले आहे. या संदर्भात, भारतीय खलाशांना (जगताप आणि बागुल) तत्काळ कॉन्सुलर ऍक्सेस प्रदान करण्यासाठी आणि त्यांच्या तत्काळ मायदेशी परत येण्यासाठी भारतीय मिशनच्या हस्तक्षेपाची विनंती यूनियनला केली होती. या विषयावर तुमचा त्वरित प्रतिसाद खूप कौतुकास्पद असेल, असे लिहिलेले पत्र यूनियनचे अध्यक्ष संजय पवार यांनी परराष्ट्र मंत्री डॉ. जय शंकर यांना लिहले होते.

ऑल इंडिया सीफेरर्स युनियनचे कार्याध्यक्ष अभिजित सांगळे यांनी त्वरित कुवेतमधील भारतीय दूतावासाशी संपर्क करून सर्व प्रथम त्या दोन खलाशांना ताब्यात घेण्यास सांगितले, व नंतर त्यांचे अपातकाल पासपोर्ट काढून त्यांना भारतात परत पाठवण्याची विनंती केली. तसेच, अडकलेल्या भारतीय खलाशांच्या मदतीसाठी त्यांनी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाला पुढाकार घेण्याची विनंती केली होती.

या सर्व गोष्टींचा पाठपुरावा करून अखेर १ मार्च २०२४ या दिवशी नाशिकमध्ये राहणारे ते २ नाविक मूंबई येथे उतरले व त्यांनी सर्व प्रथम ऑल इंडिया सिफेरर्स यूनियनचे अध्यक्ष संजय पवार व कार्याध्यक्ष अभिजित सांगळे यांचे आभार मानले तसेच मूलांच्या कूटूंबियांनीदेखील यूनियनचे आभार मानून अशीच लोकांची सेवा करत रहा तुम्हाला खूप आशीर्वाद भेटतील, असे सांगितले.

## निवडक



### अग्निवीर प्रबोध म्हात्रेचा सत्कार

**पनवेल :** तालुक्यातील कोन गावातील सुपुत्र प्रबोध नंदकिशोर म्हात्रे याने आपले सैनिकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याची केंद्र शासनाच्या अग्निपथ योजनेमध्ये सैन्य भरती झाल्याने कोण ग्रामस्थांच्या वतीने त्याचा अग्निवीर म्हणून सन्मान करण्यात आला. प्रबोध म्हात्रे याची अग्निवीर म्हणून भारतीय सैन्य दलात चार वर्षांसाठी निवड झालेली असल्याने त्याचा सत्कार सन्मान समारंभ आयोजित केला होता. प्रबोध याचे माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक दोन वर्षे तो कोल्हापूरमध्ये एका सैनिकी अकॅडमीमध्ये शिक्षण घेत होता. भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झाल्याने संपूर्ण गावाला त्याचा अभिमान असल्याने त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### हेल्प पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई :** डॉ. बीआरसी यांच्या नवीन 'लेट युअर सेकंड हार्ट हेल्प'द्वारे 'टेलरिंग इज द हेल्दी प्रोफेशन' या महत्त्वपूर्ण अभ्यास पुस्तकाचे प्रकाशन एचआयआयएमएस, नवी मुंबई येथे करण्यात आले. या वेळी आचार्य मनीष आणि डॉ. बिस्वरूप रॉय चौधरी (बीआरसी) उपस्थित होते. या अभ्यासात एक आश्चर्यकारक निरीक्षण समोर आले आहे. की टेलर ही अशी व्यक्ती की जी ते ज्याचे कामच मुळात बैठे असूनदेखील आपल्यातील सर्वांत निरोगी गट म्हणून तो ओळखला जातो. एक निरोगी व्यवसाय म्हणून टेलरिंगचे महत्त्व अधोरेखित करून, व्यवसाय आणि आरोग्य यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यासाठी हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरत आहे. या वेळी डॉ. सुनील चव्हाण, निवृत्त न्यायाधीश बी जी कोळसे पाटील, आचार्य मनीष उपस्थित होते.



### विज्ञान एकांकिका स्पर्धा उत्साहात




**नवी मुंबई :** ग्रंथाली-प्रतिभांगण विज्ञानधारा यांच्या वतीने नवी मुंबई महापालिका शाळा तसेच ठाणे जिल्ह्यातील शाळांकरिता विज्ञान एकांकिका स्पर्धा २६ ते २८ फेब्रुवारीदरम्यान नवी मुंबई महापालिकेच्या सहयोगाने व अन्वय प्रतिष्ठानच्या सहकार्याने नमुंमपा राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, रबाळे येथे झाली. या स्पर्धेत ३००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये नवी मुंबई मनपा शाळा क्र.४६ गोठिवली यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. याचप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर, रबाळे यांनी द्वितीय तसेच नमुंमपा शाळा क्र.११६ सानपाडा यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. शिरवणे आणि पावणे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात आली.

### गुलाबपुष्प देऊन परीक्षार्थींचे स्वागत

**नवी मुंबई :** विविध ठिकाणच्या परीक्षा केंद्राबाहेर परिक्षार्थी व त्यांच्या पालकांनी गर्दी केल्याचे चित्र काल पहावयास मिळाले. नवी मुंबई विद्यालय सेक्टर २६ या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून कोपरी गावचे भाजप कार्यकर्ते परशुराम ठाकूर यांनी परीक्षार्थी व त्यांच्या पालकांना गुलाब आणि पेन भेट देऊन शुभेच्छा दिल्या. अनेकांनी आवडीने पेन व गुलाब घेतले. विद्यार्थ्यांसोबत आलेल्या पालकांनी या स्वागताचे कौतुक करून ठाकूर यांचे आभार मानले, तर आयुष्यात महत्वाचा टप्पा असलेल्या दहावीच्या हिल्याच पेपरच्या तणावात असलेल्या विद्यार्थ्यांना या अनोख्या स्वागताचे धीर मिळाला.

# पनवेल महापालिकेची मालमत्ता जप्ती मोहीम

## २८०हून अधिक थकबाकीदारांना नोटीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे २८० हून अधिक जप्तीपूर्वीच्या नोटीसा थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुचनेनूसार पुढील महिन्यात जप्ती मोहीम अधिक तीव्र करण्याचा इशारा महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहेँ परंतू आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांचा खूप जास्त मालमत्ता कर भरावयाचा राहीला अशा सुमारे १०१ औद्योगिक, १०७ अनिवासी, १०० निवासी थकबाकीदारांची यादी आज १० दैनिकांमध्ये प्रसिध्द केली आहे. यांना आता जप्तीपूर्व नोटीसा देण्याचे काम पालिकेने युध्दपातळीवर सुरू केले आहे. याचा थकबाकीदार यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात ३लाख ५० हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन तयार केले आहेत. तसेच ऑनलाईन आणि विविध पच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात आत्तापर्यंत २६४ कोटी मालमत्ता कर जमा झाला आहे. नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड' तयार केले आहे. ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरण्यासाठी panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊन पे प्रॉपर्टी टॅक्सवर जाऊन आपला मालमत्ता सांकेतिक क्रमांक, नोड, सेक्टर क्रमांक, प्लॉट क्रमांक टाकल्यास मालमत्ता धारकाचे बिल पहावयास मिळेल. अंशत: कराची रक्कम भरावयचादेखील येथे ऑप्शन आहे. त्यानंतर पेमेंटचे वेगवेगळे ऑप्शन मालमत्ताधरकांना दिसतात.



जप्ती पथकाच्या कारवाईमध्ये खारघर, कामोठे, नवीन पनवेल येथील विविध थकबाकीदारांना नोटीसा देण्यात आल्या. मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून चारही प्रभागांमध्ये केले जात आहे. या आवाहनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेचwww.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा,असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




# नवी मुंबईत कपड्यांच्या कचऱ्याचे व्यवस्थापन; महापालिकेचा टेक्सटाईल समितीसोबत करार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत घनकचरा व्यवस्थापनातील ओला, सुका, घरगुती घातक अशा तीन प्रकारच्या कचरा वर्गीकरणावर बारकाईने लक्ष दिले जात असताना आता केंद्र सरकारच्या टेक्सटाईल समितीने नवी मुंबई महापालिकेसोबत सामंजस्य करार केला असून या माध्यमातून कपडयाच्या कचरा व्यवस्थापनामध्येही नवी मुंबई या प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या माध्यमातून आणखी एक यशस्वी पाऊल टाकत आहे.

नुकताच नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त तथा प्रशासक राजेश नार्वेकर यांनी ग्राहकांकडून वापरानंतरच्या कापडी कचऱ्याचे व्यवस्थापन करुन या साखळीतील शाश्वतता व पुनर्चक्रीकरण प्रक्रियेचा प्रायोगिक प्रकल्प राबविण्याबाबत केंद्र सरकारच्या टेक्सटाईल समितीसोबत सामंजस्य करार केला आहे. कराराचा कोणताही आर्थिक भार नवी मुंबई महापालिकेवर पडणार नाही. केंद्र सरकारसोबत अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारी नवी मुंबई ही देशातील पहिली महापालिका आहे.

> **पर्यावरणशील सकारात्मक पाऊल**
>
> वस्त्रोद्योग मूल्य साखळीतून सामाजिक आणि पर्यावरणीय ओझे कमी करण्यासाठी सामुहिक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने टेक्सटाईल समितीसोबत सामंजस्य करार करुन नवी मुंबई महानगरपालिकेने एक पर्यावरणशील सकारात्मक पाऊल उचलले आहे.

नवी दिल्ली येथे भारत मंडपम सभागृहात झालेल्या या सामंजस्य करार स्वाक्षरीप्रसंगी केंद्रीय वस्त्र मंत्रालयाच्या राज्यमंत्री दर्शना जरदोश, वस्त्र मंत्रालय सचिव रचना शाह, वस्त्र मंत्रालयाच्या सहसचिव प्राजक्ता लवंगारे वर्मा, वस्त्र आयुक्त रुप राशी तसेच नमुंमपा आयुक्त तथा प्रशासक राजेश नार्वेकर यांचे प्रतिनिधी म्हणून घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे व अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड उपस्थित होते. हा सामंजस्य करार केंद्रीय टेक्सटाईल समिती तसेच नवी मुंबई महानगरपालिका आणि एसबीआय फाऊंडेशन, आयडीएच इंडीया व टिजर आर्टिसन ट्रस्ट यांच्यामध्ये झालेला आहे.

भारतातील उदयोगांमध्ये कापड उद्योग हा बहुतांश लोकांना रोजगार उपलब्ध करून देणारा दुसऱ्या क्रमांकाचा महत्वाचा उद्योग असून कापडाच्या वाढत्या मागणीमुळे वस्त्रोद्योगपूर्व आणि नंतर मोठया प्रमाणात कचरा निर्माण होतो. कापडाच्या वापरानंतर साधारणत: ९८ टक्के कचरा घनकचरा प्रकल्पस्थळी जातो. एकूण कार्बन उत्सर्जनातही वस्त्रोद्योगाचा १० टक्के इतका मोठा वाटा असून एकूण कार्बन उत्सर्जनात हा पाचवा सर्वात मोठा वाटा आहे.




# नवी मुंबईत जागतिक दर्जाची सौंदर्य स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

सर्वांत प्रतिष्ठित सौंदर्य स्पर्धांपैकी जी मानली जाते ती अर्थातच मिस नवी मुंबई आपल्या तेराव्या पर्वात पदार्पण करीत आहे. जागतिक दर्जाची सौंदर्य स्पर्धा आपल्या नवी मुंबईत होणार आहे. अथक परिश्रमानंतर ही स्पर्धा सर्वोत्कृष्ट व सर्वांत प्रतिष्ठित बनली आहे.

अंतिम फेरीमध्ये दाखल झालेल्या सौंदर्यवती श्रद्धा चौधरी, गीताश्री डेका, हर्षिखा रावत, भावना अजवानी, स्नेहा धाकटे, श्रिया नंदिनी, सपना देवडा, सुकन्या कंदारकर, कनक अग्निहोत्री, कुमुद कुमार, अनुष्का सिंह, मयुरी मिश्रा, हिमांशी छल्लानी, तमन्ना भरत किताब जिंकण्यासाठी सज्ज आहेत.

रॅम्प वॉकचे प्रशिक्षण अभिनेत्री आणि मॉडेल सिमृती बथिजा- रनवे कोरिओग्राफी आणि पेजेंट ग्रूमिंग एक्सपर्ट- मिस इंडिया इंटरनॅशनल २०१९ द्वारे केले जाईल. तसेच व्यक्तिमत्व विकास, सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग आणि मेंटल वेलनेस मेंटॉरिंग हे मानसशास्त्रज्ञ आणि व्यक्तिमत्व विकास मेंटॉर - इंदरप्रीत कौर गुप्ता यांच्याद्वारे दिले जातील. जेणेकरून त्यांच्यातील व्यक्तीमत्वाला चालना मिळेल व अंतिम फेरीत स्वतःला त्या सिद्ध करतील. या स्पर्धेची अंतिम फेरी आंतराष्ट्रीय महिला दिनी शुक्रवारी (दि. ८) वाशीच्या फॉर फोईन्ट्समध्ये होईल.

आंतरराष्ट्रीयस्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करणे व जागतिक सौंदर्य स्पर्धा जिंकणे सोपे नाही. प्रथम फेरीत शेकडो सहभागी स्पर्धकांमधून सर्वोत्कृष्ट सौंदर्यवतीं निवडणे खूप कठीण आहे. निवडलेल्या सौंदर्यवतींना यू अँड आय टिम च्या वतीने उत्तमरित्या प्रशिक्षित केले जाते. यू अँड आय एंटरटेनमेंट चे हरमीत सिंग यांनी सांगितले.

# सिडको युनियनच्या अध्यक्षपदी जे.टी.पाटील, सरचिटणीसपदी नितीन कांबळे

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको एम्प्लॉइज युनियन एक बलाढ्य कर्मचारी संघटना म्हणून महाराष्ट्रात ओळखली जाते. या महिन्यात सिडको कर्मचारी संघटनेला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. आजतागायत संघटनेला अभ्यासू अध्यक्ष व सरचिटणीस लाभले आहेत. या महिन्यात विनोद पाटील हे संघटनेचे अध्यक्ष सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या जागी सर्वानुमते जे. टी. पाटील यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

नितीन कांबळे हे मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे सरचिटणीसपदी असताना त्यांनी केलेल्या कामाची पोचपावती म्हणून नितीन कांबळे यांची सिडको कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस म्हणून नियुक्ती ही सर्वानुमते करण्यात आली. चिटणीस या पदावर तरुण कर्मचारी यातिश पाटील यांची निवड झाली. या नयुक्तीमुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# आज शासन आपल्या दारी उपक्रम




**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे जिल्ह्यातील योजनेच्या लाभार्थ्यांकरिता 'शासन आपल्या दारी' हा विशेष कार्यक्रम रविवारी (दि. ३) कल्याण येथे प्रीमियर मैदान, कल्याण-शिळफाटा मार्ग, कोळे याठिकाणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार आणि पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत आहे. याविषयी ठाणे जिल्हाधिकारी स्तरावर झालेल्या आढावा बैठकीनंतर नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी या अभियानांतर्गत महापालिकेमार्फत करावयाच्या कामांविषयी नियोजनाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी-कर्मचारी यांस निर्देश दिले.

शासकीय योजनांसाठी पात्र असलेले लाभधारक व शासन यांच्यामध्ये अधिक समन्वय होऊन नागरिकांच्या प्रती आपुलकी आणि बांधिलकी जपण्याची शासनाची भूमिका नागरिकांपर्यंत प्रत्यक्ष पोहचावी यादृष्टीने 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम नागरिकांसाठी योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी अत्यंत लाभदायी आहे.

या उपक्रमामध्ये ठाणे जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा तसेच नवी मुंबई महापालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्था यांचा सक्रिय सहभाग महत्वाचा असून विविध शासकीय विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचे लाभ एकाच दिवशी विक्रमी संख्येने लाभार्थ्यांपर्यंत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहचविले जाणार आहेत.

या उपक्रमाच्या नियोजनाकरिता खासदार श्रीकांत शिंदे यांनी विविध विभागांचा आढावा दूरदृष्यप्रणालीद्वारे घेतला असून यामध्ये जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यामध्ये नवी मुंबई महापालिकाअतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनीही सहभागी होत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने आयुक्त नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी करण्यात आलेल्या नियोजनाविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाप्रसंगी नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील शासकीय योजनांचे लाभार्थीही उपस्थित राहणार असून याबाबतची सर्व व्यवस्था तसेच कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची उपलब्धताही नवी मुंबई महापालिकेमार्फत करून देण्यात येत आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी ३ मार्च रोजीच्या कोळे, कल्याण येथील 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमावेळी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिका आयुक्त नार्वेकर यांनी केले आहे.

# कर भरा; अन्यथा जप्तीला सामोरे जा!

## अलिबाग नगर परिषदेचा १०० टक्के वसुलीचा संकल्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षांपासून थकीत मालमत्ता कर न भरणाऱ्यांविरोधात वसुली मोहीम सुरू करण्यात आली आहे. जे मालमत्ताधारक कर भरत नाहीत त्यांना समज देत कर भरा; अन्यथा मालमत्ता सील कराव्या लागतील अशी समजही नगर परिषदेमार्फत देण्यात आली आहे. थकीत मालमत्ता कर १० कोटी ९० लाखांपैकी आतापर्यंत पाच कोटी २१ लाखांची वसुली केली असली तरी मार्च अखेरपर्यंत १०० टक्के मालमत्ता वसुलीचा संकल्प पालिकेने सोडला आहे.



थकीत कराच्या वसुलीसाठी नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांची वसुली पथके तयार केली असून प्रत्येक पथक पालिका हद्दीतील मालमत्तांना प्रत्यक्ष भेट देऊन करांची वसुली करण्याचे काम सुरू आहे. जे मालमत्ताधारक कराची रक्कम भरण्यास टाळाटाळ करीत आहेत अशा मालमत्तांचा पाणीपुरवठा खंडित करण्याबाबत सूचित केले जात असून अंतिमतः जप्तीची कारवाई करण्याची तजवीज ठेवलेली आहे तसेच वसुलीबाबत जनजागृती बॅनर लावण्यात आले आहेत. शनिवार, रविवार सुट्टी दिवशी कार्यालय वसुली काउंटर चालू ठेवण्यात येत आहे. शहरात रिक्षाद्वारे उदघोषणाही करण्यात येत आहे.

कर वसुलीसाठी सर्व अधिकारी, कर्मचारी यांना सूचना केल्या जातात. त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे वसुली शक्य होत आहे. नागरिकांकडून कराचा भरणा करून घेण्यासाठी अधिकारी प्रयत्न करीत आहेत.

### कर वसुलीत वाढ

*सन २०२२च्या तुलनेत २०२३मध्ये कर वसुलीत वाढ झालेली दिसून येत आहे. ही वाढ जवळपास २.६२ टक्के आहे. मार्चअखेरपर्यंत कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा कर्मचाऱ्यांचा मानस आहे. मालमत्ता कर वसुलीवर अधिक भर दिला असून आता पर्यंत ४८ टक्के कर वसूल करण्यात आला आहे.*

### विकासासाठी कर वसुली महत्त्वाची

*शहराच्या विकासासाठी करवसुली महत्त्वाची मानली जाते. कर वसुलीतून जो पैसा जमा होतो त्यातून शहरातील अनेक मूलभूत सुविधा पुरवल्या जातात. कर वसुलीसाठी अभ्यासपूर्ण नियोजन केले जात आहे.*

**आतापर्यंत पाच कोटी २१ लाख रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. मार्चअखेरपर्यंत १०० टक्के घरपट्टी वसुलीचा संकल्प आहे. त्या दृष्टीने कर विभाग कामाला लागला आहे. कर वसुलीसाठी विविध पथक तयार करून कर वसुली करीत आहे तसेच घरपट्टी कर वसुलीमध्ये शासकीय कार्यालयांची अधिक आहे.**

**–अंगाई साळुंखे, मुख्याधिकारी, अलिबाग नगर परिषद**

# रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रात सरासरी ५०.६० टक्के पाणीसाठा उपलब्ध

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात सरासरी ५०.६० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. अजूनही मार्च, एप्रिल, मे व जुनचा पहिला आठवडा पाऊस येण्यासाठी शिल्लक आहे. त्यामुळे पाणी जपून वापरण्याची आवश्यकता आहे.

रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील आंबेघर व पनवेल तालुक्यातील उसरण धरण क्षेत्रात सर्वाधिक ७७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे, तर सुधागड तालुक्यातील ढोकशेत धरण क्षेत्रात सर्वांत कमी २७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील धरण क्षेत्रातातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होताना दिसत आहे. गेल्या वर्षापेक्षा यंदा जिल्ह्यातील धरण क्षेत्रातील पाणीसाठा कमी होताना दिसत आहे. गेल्या वर्षी याच दिवशी ६२.६० टक्के पाणीसाठा उपलब्ध होते. या वर्षी १२ टक्क्यांनी पाणीसाठा कमी आहे.

### तालुकानिहाय धरण क्षेत्रात उपलब्ध पाणीसाठा टक्क्यांमध्ये

*आंबेघर (ता. पेण) ७७ टक्के, वावा (ता. तळा) ७० टक्के, सुतारवाडी (ता. रोहा) ५८ टक्के, श्रीगाव (ता. अलिबाग) ४७ टक्के, फणसाड (ता. मुरूड) ३३ टक्के, सुधागड तालुक्यातील उन्हेरे ४० टक्के, घोटवडे ३९ टक्के, कोंडगाव ३५ टक्के, कवेळे २६ टक्के, ढोकशेत १७ टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी ७१ टक्के, कार्ले ५४ टक्के, रानीवली ३४ टक्के, म्हसळा तालुक्यातील संदेरी ७१ टक्के, पाभरे ६४ टक्के; महाड तालुक्यातील वरंद ४७ टक्के, खिंडवाडी ४३ टक्के, खैरे ३६ टक्के, कोथुर्डे २४ टक्के, कर्जत तालुक्यातील साळोख ६२ टक्के, अवसरे ४४ टक्के, खालापूर तालुक्यातील भिलवले ६७ टक्के, कलोते मोकाशी ५८ टक्के, डोणवत ४४ टक्के, पनवेल तालुक्यातील मोरबे व बामणोली ६८ टक्के, उसरण ७७ टक्के आणि उरण तालुक्यातील पुनाडे धरणक्षेत्रात ४३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.*

# जिल्हाधिकारी कार्यालयात घुसला साप

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्याधिकारी कार्यालयात एरवी आगंतुकांची वर्दळ कायमच सुरू असते. निरनिराळी कामे घेऊन याचिकाकर्ते कार्याललयात येत असतातम पण एक आगंतुक जिल्हाधिकारी कार्यालयात आला आणि सर्वांनाचेच धाबे दणाणले.

जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी सकाळी १० वाजता दैनंदिन कामकाजाला सुरुवात झाली. सर्वजण आपापल्या कामात व्यस्त होते. खालच्या मजल्यावर असलेल्या नोंदणी शाखेत येणारे जाणारे याचिकाकर्ते आपली टपाल नोंदवित होती. साडेबाराच्या सुमारास एक महिला कर्मचारी कक्षातील जमा झालेल्या फायलीची आवरासावर करत असताना तिच्या हाताला स्पंजसारख्या वस्तूचा स्पर्श झाला. नीट नीरखून पाहीले



असता, फाईलींच्या आडोश्यात एक भला मोठा साप लपून बसल्याचे लक्षात आहे. सापाला पाहून कर्मचाऱ्यांची धांदल उडाली. घाबरून सर्वजण कक्षाच्या बाहेर जाऊन उभे राहीले.

जिल्हाधिकारी कार्यालयात साप शिरल्याची बातमी वाऱ्याच्या वेगाने सर्व विभागात परसली. साप पाहण्यासाठी कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येनी जमा झाला. काही जण अप्रुप म्हणून, तर काही जण भितीने सापाला बघत होते. अशातच काही सतर्क कर्मचाऱ्यांनी सर्पमित्रांना फोन लावून बोलावले. सर्पमित्राने येऊन सापाला पकडले.

हा साप धामण प्रजातीला आणि बिनविषारी असल्याचे सांगितले आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला, मात्र हा साप थेट जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती भागात शिरला कसा याचा शोध लागू शकलेला नाही. या घटनेनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसराची साफसफाई करण्याची मागणी केली जाऊ लागली आहे.

# वढाव येथील ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**पेण : प्रतिनिधी**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कोएसो संस्थेच्या पेण येथील वढाव येथील बळीराम गणा ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन झाले. याचे उद्‌घाटन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे रायगड जिल्हा प्रधान सचिव संदेश गायकवाड आणि पेण शाखा प्रधान सचिव जगदीश डंगर यांच्या हस्ते करण्यात आले.

जगाची प्रगती मग ती आरोग्यावर असेल, औद्योगिक असेल, शैक्षिणक असेल ही सर्व प्रगती विज्ञानामुळे झाली आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेले वेगवेगळे वैज्ञनिक प्रयोगावर विद्यार्थ्यांचे कौतुक करताना या



ग्रामीण भागातील विद्यार्थी हे या देशातील भविष्यातील वैज्ञानिक आहेत, असे संदेश गायकवाड यांनी सांगितले.

या वेळी गायकवाड यांनी चमत्कारामागील विज्ञान आणि भूत, भानामती, आत्मा या विषयावर व्याख्यान दिले. जगदीश डांगर यांनी चमत्कार सादरीकरण आणि वैज्ञानिक गाण्यांच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचा प्रयत्न केला.

# रोह्यात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**रोहे : प्रतिनिधी**

धावीर देवस्थान ट्रस्टचे मकरंद बारटके यांच्या उपस्थितीत मराठी राजभाषा दिन उत्साहात पार पडला. संत ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानाचे मराठी भाषेतील महत्व अतिशय सोप्या शब्दात त्यांनी उपस्थितांना सांगितले, तर दुर्ग अभ्यासक, लेखक, रायगड भूषण सुखद राणे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषा शुद्धीकरणासाठी घेतलेली भूमिका विषद केली.

कोकण मराठी साहित्य परिषद रोहा शाखेच्या कार्याचा आढावा अध्यक्ष संध्या दिवकर यांनी प्रास्ताविकात घेतला. उपाध्यक्ष आरती धारप यांनी कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकरांच्या साहित्य प्रवासाचा थोडक्यात धांडोळा घेतला.

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास निवृत्त नायब तहसीलदार शरद पोकळे, सौ. पोकळे, कोलाड हायस्कूलचे शिक्षक सदानंद तांडेल, मंगलवाडी शाळेच्या शिक्षिका स्नेहा तांडेल, पुगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक निवास थळे, अष्टमीच्या रिद्धी बोथरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कोकण मराठी साहित्य परिषद रोहा शाखेचे संजीव शेरमकर, ज्योती शिंदे, मानसी चापेकर, विजय दिवकर, अजित पाशीलकर, नेहल प्रधान, शरद कदम, स्वराज दिवकर, चेतन बारसकर यांनी कवितांचे उत्तम सादरीकरण केले. आपल्या ओघवत्या शैलीत भारत चौधरी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

विशेष परिश्रम घेणाऱ्या सचिव विजय दिवकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम उत्तमरीत्या पार पडला.

# रायगड जिल्ह्यात ८० टक्के कुटुंबांना शासनाकडून मिळाला आनंदाचा शिधा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती या उत्सवांच्या निमित्ताने जिल्ह्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा दिला जात आहे. जिल्ह्यात २६ फेब्रुवारीपर्यंत ७९.१६ टक्के म्हणजे तीन लाख ३४ हजार ८५८ कुटुंबांपर्यंत आनंदाचा शिधा पोहच झाला आहे.

रायगड जिल्ह्यात सुमारे चार लाख २३ हजार आठ पात्र कुटुंबांसाठी आनंदाचा शिधा उपलब्ध झाला असून त्यापैकी तीन लाख ३४ हजार ८५८ कुटुंबांना आनंदाचा शिधा वाटप पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जे राव सोनवणे यांनी दिली.

अंत्योदय आणि केशरी शिधापत्रिकाधारकांना एक किलो साखर, एक लिटर खाद्यतेल तसेच प्रत्येकी अर्धा किलो या परिमाणात चणाडाळ, रवा, मैदा आणि पोहे अशा




शिधा जिन्नस समाविष्ट असलेला आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात पार पडलेला मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व छत्रपती शिवाजी महाराज जयंती या उत्सवांच्या निमित्ताने जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये आनंदाच्या शिधाचे वाटप ८ फेब्रुवारीपासून सुरू झाले आहे.

यापूर्वी राज्य सरकारच्या वतीने गुढीपाडवा, गणेशोत्सव व दिवाळी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अशा सण–उत्सवानिमित्त पात्र शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा देण्यात आला. गोरगरिबांना सण–उत्सव साजरा करता यावा यासाठी अवघ्या १०० शंभर रुपयात वेगवेगळे जिन्नस समाविष्ट असलेला आनंदाचा शिधा प्रति शिधापत्रिका एक शिधा जिन्नस संच गरजूंना देण्यात आला. जिल्ह्यातील चार लाख २३ हजार आठ शिधापत्रिका धारकांना आनंदाचा शिधा वाटप करण्यासाठी शिधा किट नियतन मंजूर झाले होते. त्यानुसार पात्र शिधापत्रिकाधारकांना किट वितरित करण्याची प्रक्रिया स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडून सुरू आहे.

आनंदाचा शिधा प्रति शिधापत्रिका एक शिधा जिन्नस संच प्रमाणे ई–पॉस प्रणालीद्वारे १०० रुपयांत वितरित केला जात आहे. उर्वरित ८८ हजार १५१ हजार लाभार्थी शिधापत्रिका धारकांना येत्या दोन ते तीन दिवसांत शिधा किट वितरीत केली जाणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांनी दिली.

**आजपर्यंत जिल्ह्यात आनंदाच्या शिधाचे ७९.१६ टक्के इतकेच वाटप पूर्ण झाले आहे. पंधरा तालुक्यांत आनंदाच्या शिधाचे वाटप लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. राज्यात अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत रायगड जिल्हा आनंदाचा शिधा वाटपात पहिल्या दहांमध्ये आहे.**

**–सर्जेराव सोनवणे, जिल्हा पुरवठा अधिकारी**

# नांदगाव हायस्कूल येथे विज्ञान दिन साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

राष्ट्रीय विज्ञान दिवस श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर हायस्कूलमध्ये साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेमध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व प्रतिकृती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

यानिमित्ताने शाळेचे मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, पर्यवेक्षिका अर्चना खोत, शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर, शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी संतोष बुल्लु, विज्ञान मंडळाचे प्रमुख प्रतीक पेडणेकर, सहाय्यक शिक्षक सागर राऊत, राहील घलटे, भारत चव्हाण, रेखा बोरजी उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना विज्ञान मंडळाचे प्रमुख प्रतीक पेडणेकर यांनी सांगितले की, सी. व्ही. रामन यांनी प्रकाशाच्या विकरणाचा जो शोधप्रबंध २८ फेब्रुवारी १९३० रोजी मांडला त्यामुळे आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आजचे युग हे विज्ञान युग असून विज्ञानाशिवाय आपण राहू शकत नाही. अज्ञान, अंधश्रद्धा दूर करून विज्ञान व तंत्रज्ञानाचा पाया मजबूत करून या विज्ञान युगामध्ये प्रगती साधता येईल.

पर्यवेक्षक, शिक्षक प्रतिनिधी यांचीही भाषणे झाली. वक्तृत्व स्पर्धा परीक्षक म्हणून राहील घलटे, भारत चव्हाण, निबंध स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सर्व महिला, प्रतिकृतीचे निरीक्षण करण्यासाठी सागर राऊत, मयूर चौलकर यांनी कामकाज पहिले. चित्रकला स्पर्धेची जबाबदारी कला शिक्षक अमर दरणे यांनी पाहिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी निशा बिरवाडकर, नियती ठमके व विज्ञान मंडळ यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमासाठी शालेय विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.

# मातृभाषेचा सर्वच क्षेत्रांत वापर होणे हाच मराठीचा खरा गौरव –ज्येष्ठ कवी अशोक गुप्ते

**खोपोली : प्रतिनिधी**

आपल्या मातृभाषा मराठीवर आपले प्रेम असायलाच हवे. भाषेचे वापरकर्ते म्हणून दैनंदिन जीवनात मराठीचा वापर सर्व स्तरावर करणे आवश्यक आहे. ज्ञान व्यवहार व जीवनाच्या सर्वच क्षेत्राच माध्यम म्हणून ती प्रभावीपणे वापरली जावी. त्यासाठी मराठी माणसाच्या इच्छाशक्तीची गरज आहे, असे विचार मराठीतील सुप्रसिद्ध कवी कै. नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'कवी बी' यांचे नातू ज्येष्ठ कवी अशोक गुप्ते यांनी व्यक्त केले.

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा खोपोली यांनी आयोजित केलेल्या मराठी भाषा गौरव दिन व पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ब्राह्मण सभा हॉल येथे ालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष साहित्यमित्र दत्तात्रेय मसुरकर होते.



अल्टा लेबोरेटरीज् कंपनीच्या संचालिका गीता धोटे, साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य व कोमसाप संपर्क प्रमुख प्रा.एल बी पाटील, खोपोली अध्यक्ष उज्वला दिघे, वसंत देशमुख मेमोरियल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष व ज्येष्ठ रंगकर्मी उल्हास देशमुख, लेखक डॉ.सुभाष कटकदौंड, जयश्री पोळ, वामनराव दिघे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

ज्येष्ठ साहित्यिक र.वा.दिघे यांनी आपल्या कथा कादंबऱ्यातून खोपोली आणि परिसराचा कलात्मक असा आविष्कार घडवला. ज्या खोपोलीत दिघे यांच्यासारखा लेखक होऊन गेला तेथे मला या कार्यक्रमासाठी सहभागी होत असल्याचा मनोमन आनंद आहे, असे सांगून कवी अशोक गुप्ते यांनी दिघे यांची ही लेखन प्रेरणा खोपोली परिसरातील अनेक लेखक मंडळी पुढे घेऊन जात असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रमुख गीता धोटे यांनी मराठीतील ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके या अल्टा कंपनीमध्ये आल्याची आठवण सांगत आपण सर्वांनी मराठीच्या संवर्धनासाठी सतत प्रयत्नशील असले पाहिजे, असे आवाहन केले.

डॉ.अस्मी सावरेकर, जयमाला जांभळे व श्रद्धा शेट्ये यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. खोपोली शाखेचे कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डीकर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका विशद केली. शाखेच्या माध्यमातून वर्षभर होत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत संस्थेसमोर असलेल्या अडचणी व आव्हानांबद्दलचे विवेचन त्यांनी केले.

शाखेच्या अध्यक्ष उज्वला दिघे यांच्या 'शिंपल्यातले मोती' (काव्यसंग्रह) लावण्यवती (एकांकिका), डॉ.सुभाष कटकदौंड यांचा 'लाईन मी तुला देनार न्हाय' (लावणी संग्रह) व जयश्री पोळ यांचे 'आठवणीचं कोंदण' (ललितगद्य) या चार पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. या तिघांनीही पुस्तक लेखनामागच्या आपल्या भावना मनोगतातून व्यक्त केल्या. उपस्थित असलेल्या सर्व रसिक वाचकांसाठी व केएमसी महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी या तीनही पुस्तकांच्या प्रती भेट म्हणून देण्यात आल्या.

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असून केवळ इंग्रजीच्या हव्यासापोटी आपण मातृभाषेकडे दुर्लक्ष करता कामा नये. कारण भाषेचे संस्कार, त्यातून दिला जाणारा विचार भावी पिढीला खऱ्या अर्थाने मार्गदर्शक ठरणार आहे. प्रदीर्घ परंपरा आणि इतिहास असलेले आपल्या मातृभाषेचा आपण सन्मान करावा. तिचा अधिकाधिक वापर करून तिला ज्ञानभाषा करण्यासाठी प्रयत्नशील राहायला हवे, असे मार्गदर्शन आपल्या अध्यक्षीय भाषणात साहित्यमित्र दत्तात्रेय मसूरकर यांनी केले. प्रा.एल बी पाटील, उल्हासराव देशमुख यांचीही भाषणे झाली.

प्रा.जी.पी मुळीक व सुधा इतराज यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. 'कथा घे, कादंबरी घे' असं म्हणत साहित्य ज्ञानविचार देणारा उज्वला दिघे लिखित 'बुरगुंडा' जयमाला जांभळे यांनी सादर केला. 'चाफा बोलेना, चाफा चालेना' ही 'कवी बी' यांची सुप्रसिद्ध कविता जयश्री पोळ व मधुमिता पाटील यांनी सादर केली.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ.प्रताप पाटील, मुख्याध्यापिका दिशा राणे, जान्सी आगस्टीन, माधवी रिठे, यशवंत सपकाळ, पत्रकार जयवंत माडपे, नितीन भावे यांच्यासह खोपोलीतील विविध सामाजिक, सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, प्राध्यापक, शिक्षक, रसिक श्रोते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. भाऊसाहेब नन्नवरे यांनी खुमासदार सूत्रसंचालन केले.

सूर्यकांत सरोदे यांनी 'कुसुमांजली' सादर केली. संतोष प्रधान यांनी 'पसायदान' गायले. शेवटी जनार्धन सताने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## रणजी ट्रॉफी स्पर्धेत उपांत्य फेरीचा थरार

# मुंबईने तामिळनाडूला १४६, तर एमपीने विदर्भाला १७० धावांत गुंडाळले

### पहिल्या दिवशी आवेश खान, तुषार देशपांडेची दमदार गोलंदाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी ट्रॉफी हंगाम २०२४चा पहिला उपांत्य सामना विदर्भ आणि मध्य प्रदेश यांच्यात, तर दुसरा उपांत्य सामना मुंबई आणि तामिळनाडू यांच्यात खेळवला जात आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात मध्य प्रदेशने विदर्भाला पहिल्या डावात अवघ्या १७० धावांत गुंडाळले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली मुंबईविरुद्ध तामिळनाडूची फलंदाजी पहिल्या डावात सपशेल अपयशी ठरली. संपूर्ण संघ १४६ धावांवर गारद झाला.



मुंबईविरुद्धच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात तामिळनाडूने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय तामिळनाडूच्या फलंदाज योग्य ठरवण्यात अपयशी ठरले, कारण या संघाचे फलंदाज मुंबईच्या घातक गोलंदाजीसमोर शरणागती पत्करताना दिसले. तामिळनाडूकडून विजय शंकरने सर्वाधिक ४४ धावा केल्या, तर वॉशिंग्टन सुंदरने ४३ धावांची खेळी केली. पहिल्या डावात साई किशोरने केवळ एका धावेची खेळी केली. मुंबईकडून तुषार देशपांडेने पहिल्या डावात सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या, तर शार्दुल ठाकूर, मुशीर खान आणि तनुष कोटियन यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. मोहित अवस्थीला एक विकेट मिळाली.

तामिळनाडूच्या १४६ धावांच्या प्रत्युत्तरात मुंबई संघ पहिला दिवसअखेर १०१ धावांनी पिछाडीवर आहे. मुंबई संघाने १७ षटकानंतर २ बाद ४५ धावा केल्या आहेत. पृथ्वी शॉ (५) आणि भूपेन ललवाणी (१५) बाद झाले आहेत. सध्या मुशीर खान (२४) मोहित अवस्थी (१) नाबाद आहेत. तामिळानाडूकडून कुलदीप सेन आणि साई किशोरने प्रत्येकी एक विकेट घेतली.

या मोसमातील पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विदर्भाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु संघाला केवळ १७० धावापर्यंतच मजल मारता आली. विदर्भासाठी करुण नायरने सर्वाधिक ६३ धावांची खेळी साकारली, तर अथर्व तायडेने ३९ धावांचे योगदान दिले. ध्रुव शौरेने या महत्त्वाच्या सामन्यात १३ धावांची खेळी केली.

मध्य प्रदेशकडून आवेश खानने अप्रतिम गोलंदाजी करताना सर्वाधिक चार विकेट्स, तर कुलवंत खजरोलिया आणि व्यंकटेश अय्यर यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. विदर्भाच्या १७० धावांच्या प्रत्युत्तरात मध्य प्रदेश संघ पहिला दिवसअखेर १२३ धावांनी पिछाडीवर आहे. मध्य प्रदेशने पहिल्या डावात पहिला दिवसअखेर २० षटकानंतर एक बाद ४७ धावा केल्या आहेत.

## यशस्वी जैस्वालला जागतिक विक्रम खुणावतोय!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना ७ मार्चपासून धरमशाला येथे खेळवला जाणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने या मालिकेत आधीच ३-१ अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. आता हा सामना जिंकून मालिका ४-१ अशी जिंकण्याचा त्याचा प्रयत्न असेल. या सामन्यात यशस्वी जैस्वालकडे इतिहास रचण्याबरोबर अनेक विक्रम मोडण्याची संधी आहे.



२२ वर्षीय यशस्वीने विझाग (विशाखापट्टणम) कसोटी सामन्यात २०९ धावांची इनिंग खेळली होती. त्यानंतर राजकोट कसोटीतही या युवा फलंदाजाने भारताच्या दुसऱ्या डावात २१४ धावा केल्या होत्या. यानंतर यशस्वीने रांची कसोटी सामन्यातही दमदार कामगिरी केली. यशस्वी जैस्वालने आतापर्यंत इंग्लंडविरुद्धच्या चालू कसोटी मालिकेत आठ डावात ९३.५७च्या सरासरीने ६५५ धावा केल्या आहेत, ज्यात दोन द्विशतके आणि दोन अर्धशतकांचा समावेश आहे. या कालावधीत यशस्वीचा स्ट्राइक-रेट ७८.६३ राहिला आहे. यशस्वीने सध्याच्या मालिकेत ६३ चौकार आणि २३ षटकार मारले आहेत.

यशस्वी जैस्वालने धर्मशाला कसोटी सामन्यात ९८ धावा केल्या, तर तो भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाजदेखील बनेल. सध्या हा विक्रम इंग्लंडचा फलंदाज दिग्गज ग्रॅहम गूचच्या नावावर आहे, ज्यांनी १९९०च्या कसोटी मालिकेत ७५२ धावा केल्या होत्या. त्याचबरोबर जैस्वालने या सामन्यात एक धाव घेताच तो विराट कोहलीला मागे टाकेल.

यशस्वी जैस्वालला माजी भारतीय कर्णधार सुनील गावसकर यांचा ५३ वर्ष जुना विक्रम मोडण्याचीही संधी आहे. गावसकर यांनी कसोटी मालिकेत सर्वाधिक ७७४ धावा केल्या आहेत. म्हणजेच यशस्वीने धरमशाला कसोटी सामन्यात १२० धावा केल्या, तर तो गावसकरांना मागे टाकून कोणत्याही कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज ठरेल. गावसकरांनी १९७१ साली वेस्ट इंडिजविरुद्धच्या पदार्पणाच्या कसोटी मालिकेत संस्मरणीय कामगिरी केली होती. त्यानंतर गावसकरांनी चार कसोटी सामन्यांमध्ये विक्रमी ७७४ धावा (चार शतके आणि ३ अर्धशतकांसह द्विशतक) केल्या होत्या. या काळात गावसकरांची सरासरी १५४.८० होती.

## निखिल इलेव्हन चिकणी संघ भाजप चषकाचा मानकरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा हरेश्वर मैदान येथे श्री तुळेश्वर क्रिकेट मित्र मंडळ थेरोंडा बाजारपाडा आयोजित भाजप चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत निखिल इलेव्हन चिकणी संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. व्दितीय क्रमांक जय मल्हार थेरोंडा, तृतीय श्री गणेश थेरोंडा संघ व चतुर्थ क्रमांक साखर-आक्षी संघाने मिळविला.



स्पर्धेत एकूण ३२ संघांचा सहभाग होता. यामध्ये गाव टू गाव २४ संघ व आठ ओपन संघ घेण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन भाजप जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, भाजप नेते माणिक बळी, रेवदंडा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रफुल्ल मोरे, उपसरपंच मंदाताई बळी यांच्या उपस्थितीत झाले.

स्पर्धेचा मालिकावीर निखिल पाटील ठरला. स्पर्धेचे बक्षीस वितरण भाजप नेते संतोष पाटील, दिलीप पटेल, ग्रामपंचायत सदस्य सुराराम माळी, दुशांत झावरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

## विक्रांत इलेव्हन संघाने मुकद्दर ट्रॉफी जिंकली




**माथेरान : प्रतिनिधी**


माथेरान येथील मुकद्दर क्रिकेट संघ आयोजित स्पर्धेत विक्रांत इलेव्हन संघाने विजेतपद प्राप्त केले, तर यजमान संघ उपविजेता ठरला. तीन दिवस सुरू असलेल्या या भव्य टेनिस बॉल क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी वीर हुताता भाई कोतवाल क्रीडा संकुलात प्रेक्षकांनी गर्दी केली होती. मालिकावीर म्हणून विजय आखाडे याची निवड करण्यात आली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुस्लीम समाजाच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## रवींद्र जडेजा कसोटी क्रिकेटमध्ये विकेट्सचे त्रिशतक करण्याच्या जवळ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी डावखुरा फिरकी गोलंदाज रवींद्र जडेजा इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पाचव्या आणि शेवटच्या सामन्यात मोठा विक्रम करू शकतो. ३५ वर्षीय अष्टपैलू जडेजा कसोटी क्रिकेटमध्ये अनोखे त्रिशतक झळकावण्याच्या जवळ आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना ७ मार्चपासून धरमशाला येथील एचपीसीए स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

सध्याच्या कसोटी मालिकेत भारताने इंग्लंडविरुद्ध ३-१ अशी अभेद्य आघाडी कायम ठेवली आहे. भारताने याआधीच कसोटी मालिका जिंकली आहे. या मालिकेत रवींद्र जडेजा कसोटी क्रिकेटमध्ये मोठे यश मिळविण्याच्या अगदी जवळ आहे. जडेजाने आतापर्यंत भारताकडून कसोटी क्रिकेटमध्ये ७१ कसोटी सामन्यांमध्ये २९२ विकेट्स घेतल्या आहेत. धरमशाला येथे इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या सामन्यात जडेजाने आठ विकेट्स घेतल्यास तो इतिहास घडवेल. त्याने सध्याच्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील तीन सामन्यांत १७ विकेट्स घेतल्या आहेत.



जडेजाच्या सध्या कसोटी कारकिर्दीत २९२ विकेट्स आहेत. जर त्याने आठ विकेट्स घेतल्या, तर त्याच्या कसोटी फॉरमॅटमध्ये ३०० विकेट्स होतील. त्यामुळे अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय डावखुरा फिरकी गोलंदाज ठरणार आहे. श्रीलंकेचा रंगना हेराथ आणि न्यूझीलंडचा डॅनियल व्हिटोरी यांच्यानंतर एकूणच हा टप्पा गाठणारा तो तिसरा डावखुरा फिरकी गोलंदाज ठरेल. दरम्यान, जडेजाला इंग्लंडच्या डेरेक अंडरवूडला मागे टाकण्यासाठी आणि डावखुरा फिरकीपटूसाठी इतिहासातील तिसरा सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरण्यासाठी आणखी पाच विकेट्सची गरज आहे.

**कपिल देवचा विक्रम मोडण्याचीही संधी**

रवींद्र जडेजाने कसोटी सामन्यात नऊ विकेट घेतल्यास तो कपिल देवला मागे टाकून भारतीय भूमीवर चौथा सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरेल. त्याच्याकडे सध्या भारतात २११ विकेट्स आहेत. कपिल देवने २१९ विकेट्स घेतल्या आहेत. याआधी कसोटी मालिकेत भारताचा फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनने अनिल कुंबळेला मागे टाकून ३५४ विकेट्स घेऊन भारतीय भूमीवर सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला.

## गौतम गंभीरचा आगामी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजप नेता आणि माजी क्रिकेटपटू गौतम गंभीरने लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने स्वतः ट्वीट करून ही माहिती दिली.

गौतम गंभीरने म्हटले आहे की, मी भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांना माझ्या राजकीय जबाबदारीतून मुक्त करण्याचे आवाहन करतो, जेणेकरून मी क्रिकेटवर लक्ष केंद्रित करू शकेन. गौतम हा पूर्व दिल्ली लोकसभा मतदारसंघातून भाजप खासदार होता. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत विजय मिळवून पहिल्यांदाच संसदेत पोहचला होता.



गौतमने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्विटरवर लिहिले की, मला जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे मनापासून आभार मानतो. जय हिंद!

गौतम गंभीरने राजकीय कारकिर्दीत पहिल्यांदाच नशिब आजमावित असताना २०१९च्या लोकसभा निवडणुकीत विजय मिळविला होता. त्याच्यासमोर आम आदमी पक्षाच्या आतिशी मार्लेना आणि काँग्रेसचे अरविंदर सिंह लवली रिंगणात होते. या दोघांना गंभीरने मात दिली होती.

## अलिबाग क्रीडा महोत्सवाला प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

क्रिकेट आणि कबड्डीच्या युगात लगोरी, रस्सीखेच, बाहुबली, सायकल आणि धावण्याच्या स्पर्धांनी अलिबाग क्रीडा महोत्सवात रंगात आणली. सलग दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात क्रीडा क्षेत्राचे जीवनातील महत्त्व बियु फाऊंडेशनने संपूर्ण रायगडकरांसमोर ठेवले. हजारो खेळाडू आणि क्रीडा रसिकांनी आपली हजेरी लावून महोत्सवाला दाद दिली.



अलिबाग क्रीडा महोत्सवाला पहिल्या दिवशी सकाळी वाळूतील सायकल स्पर्धेने सुरुवात झाली. अलिबागच्या माजी उपनगराध्यक्ष मानसी म्हात्र, यतीन घरत यांच्या हस्ते या स्पर्धेला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. या स्पर्धेमध्ये महिलांच्या खुल्या गटात मनीषा माने प्रथम, पायल धनगर द्वितीय, चैताली शिलधणकर तृतीय आणि साक्षी शिंदे हिने चतुर्थ क्रमांक पटकावला. पुरुषांच्या खुल्या गटात प्रांजल पाटील प्रथम, देवर्षी पाटील द्वितीय, निकेत पाटील तृतीय आणि चेतन नेमन यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला.

सायंकाळी अलिबाग क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन पीएनपी शैक्षणिक संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, जि.प.च्या माजी अध्यक्ष अपेक्षा कारेकर, अमोल कारेकर, आरसीएफ प्रशासनाचे व्यवस्थापक संजीव हर्लीकर, जनसंपर्क अधिकारी संतोष वझे, गेल व्यवस्थापनाचे संचालक अनुप गुप्ता, व्यवस्थापक जतीन सक्सेना, व्यवस्थापक वीरेंद्र कुमार, निर्मल सेल्सचे राहुल पाटील, रोहन पाटील, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, माजी नगरसेवक प्रदीप नाईक, प्रीती झुंजारराव, पीएनपी शैक्षणिक संस्थेचे संचालक विक्रांत वार्डे, चंद्रकांत वाजे, डॉ. विनायक पाटील, मिस्टर इंडिया प्रतीक पांचाळ, मिस्टर इंडिया रोहन कदम आदी उपस्थित होते.

उदघाटनानंतर महिलांचे कबड्डी आणि बॉक्स क्रिकेटच्या स्पर्धा घेण्यात आल्या यामध्ये महिलांच्या कबड्डी स्पर्धेत कर्नाळा स्पोर्ट्स क्लब पनवेल प्रथम, भिलेश्वर क्रीडा मंडळ किहीम द्वितीय, ऋतुजा स्पोर्ट्स क्लब पेण तृतीय आणि प्रतिज्ञा क्रीडा मंडळ बांधण यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला. कबड्डी स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाडू रूपाली जाधव, उत्कृष्ट चढाई धनश्री ठाकूर, उत्कृष्ट पकड आंबेकर आणि पब्लिक हिरो म्हणून ऋचा भागात हिला सन्मानित करण्यात आले.

बॉक्स क्रिकेट स्पर्धेत मरीआई मेटपाडा प्रथम, अँजेल स्पोर्ट्स सुतारपाडा द्वितीय आणि सुभान इलेव्हन अलिबाग या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत मालिकावीर ऋषभ (सुतारपाडा), उत्कृष्ट फलंदाज वरुण (मेटपाडा), उत्कृष्ट गोलंदाज राहुल (अलिबाग) याला सन्मानित करण्यात आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धा झाली. या स्पर्धेत पुरुषांच्या खुल्या गटात रायगड पोलीस लक्ष्मण दरवडा प्रथम, स्वराज पाटील द्वितीय, सर्वेश पाटील तृतीय आणि रामू पारधी या धावपटूंनी चतुर्थ क्रमांक पटकावला. महिला खुला गटात कोमल खांडेकर प्रथम, आदिती पाटील द्वितीय, पौर्णिमा म्हात्रे तृतीय आणि पूर्व नाईक या महिला धावपटूने चतुर्थ क्रमांक पटकावला. ४० वर्षावरील मॅरेथॉनच्या पुरुष खुल्या गटात नाथा गिरणेकर प्रथम, महेश नवगावकर द्वितीय, सचिन पत्रे तृतीय आणि मिलिंद शिळधणकर यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला. महिलांच्या गटात वर्षा पाटील प्रथम, तृप्ती म्हात्रे द्वितीय, ज्योती घरत तृतीय आणि कविता फुलगावकर यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला.

सायंकाळी महिलांची लगोरी स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेत रायगड जिल्हा लगोरी असोसिएशन प्रथम, कुलाबा क्रीडा प्रबोधिनी अलिबाग द्वितीय, कोहिनुर लायन्स अलिबाग तृतीय आणि सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूल अलिबाग या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. यानंतर रस्सीखेच स्पर्धा रंगली. या स्पर्धेत महिलांच्या गटात ओएसवाय पॅन्थर प्रथम, प्रिझम संस्था द्वितीय आणि ओएसवाय वॉरियर्स या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. पुरुषांच्या गटात कुलाबा क्रीडा प्रबोधिनी अलिबाग प्रथम, जय बजरंग बेलकडे द्वितीय आणि रायगड कॉप्स अलिबाग या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

अलिबाग क्रीडा महोत्सवाची सांगता क्रॉस फिट म्हणजेच बाहुबली. आयोजकांनी खेळाचे नियम आणि द्याव्या लागणाऱ्या परीक्षेचा नमुना स्पर्धकांसमोर सादर केला आणि स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेमध्ये महिलांच्या गटात काजल जैन प्रथम, सुप्रिया चिमणे द्वितीय आणि भूमी म्हात्रे हिने तृतीय क्रमांक पटकावला; तर पुरुषांच्या गटात प्रसाद कावरा प्रथम, प्रथम साळुंखे द्वितीय आणि ऋषिकेश राऊत या खेळाडूने तृतीय क्रमांक पटकावला. वैजयी स्पर्धकांना मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com